CMYK

अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, उस्मानाबाद, लातूर, विजापूर, गुलबर्गा, बिदर, बीड

www.surajyadigital.com | शुक्रवार दि. २३ डिसेंबर २०२२ | ▸ वर्ष : २१ वे ▸ अंक : ८७ वा किंमत : ५ रुपये ▸ पाने ८

# तपास अधिकाऱ्याचाच आयपीएस अधिकाऱ्यामार्फत करा तपास

## ▪ सामूहिक बलात्कार प्रकरणात हायकोर्टाने दिला आदेश
## ▪ तपास अधिकाऱ्याने केला होता आरोपींना वाचवण्याचा प्रयत्न

✔ सुराज्य/सोलापूर

**सामूहिक बलात्काराच्या गुन्ह्यातून एका आरोपीचे नाव वगळून दुसऱ्या आरोपीविरोधातील कलमे कमी करून आरोपींना सहकार्य करणाऱ्या तपास अधिकाऱ्याचाच तपास थेट आयपीएस अधिकाऱ्यामार्फत करण्याचा आदेश मुंबई उच्च न्यायालयाचे न्या. ए. एस. गडकरी व न्या.पी.डी.नाईक यांच्या खंडपीठाने राज्याच्या पोलीस महासंचालकांना दिला. या आदेशामुळे येथील फौजदार चावडी पोलीस ठाण्यातील सहाय्यक निरीक्षक (तपास अधिकारी) विष्णू गायकवाड अडचणीत आले आहेत.**

गणेश कैलास नरळे (वय २९ वर्षे, धंदा-मजुरी रा.गणेश मंदिराजवळ, आवसे वस्ती, आमराई सोलापूर) आणि विष्णू गुलाब बरगंडे (वय-४० वर्षे, धंदा-नोकरी रा. आवसे वस्ती, लक्ष्मी पेठ, सोलापूर) या दोन आरोपींविरुध्द सोलापुरातील एका महिलेने पुण्यातील बिबवेवाडी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली होती. त्यानंतर ही फिर्याद फौजदार चावडी पोलीस ठाण्यात वर्ग करण्यात आली होती. त्यावरून नरळे आणि बरगंडे यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्याचा तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक गायकवाड यांच्याकडे सोपवण्यात आला होता.

याप्रकरणी पिडीत महिलेने उच्च न्यायालयात धाव घेत या प्रकरणातील तपास अधिकारी बदलून अन्य अधिकाऱ्याची नेमणूक करून निष्पक्षपणे फेरतपास करण्याची मागणी करणारी याचिका ॲड. विक्रांत फताटे व ॲड. प्रशांत नवगिरे यांच्यामार्फत दाखल केली. या याचिकेची सुनावणी न्या. ए. एस. गडकरी व न्या.पी.डी.नाईक यांच्या खंडपीठासमोर झाल्यानंतर न्यायालयाने वरील आदेश दिला.

या प्रकरणात पिडितेतर्फे ॲड. विक्रांत फताटे व ॲड प्रशांत नवगिरे यांनी काम पाहिले.



**मूळ फिर्याद :** या प्रकरणातील फिर्यादी महिला आणि आरोपी सोलापुरात शेजारीशेजारी राहतात. आरोपी नरळे याने फिर्यादीची मुले व पतीला ठार मारण्याची धमकी देऊन फिर्यादीला मोटारसायकलवरून पुण्यातील उरळी देवाची येथे नेले होते. त्याठिकाणी खोली भाड्याने घेऊन ते दिवस राहिले. त्यानंतर ती महिला सोलापुरात परत आली. दरम्यानच्या काळात नरळे याने पुन्हा पहिल्याप्रमाणे धमकी दिली आणि पुण्यास जाण्यास सांगितले. फिर्यादी महिला पुण्यात गेल्यानंतर नरळे तिला भेटला. दोघे पुण्यातील अप्पर इंदिरानगर परिसरात खोली भाड्याने घेऊन राहू लागले. आरोपी बरगंडे हा एकेदिवशी त्याठिकाणी आला. त्यावेळी चिकन आणण्यासाठी म्हणून नरळे बाहेर गेल्यानंतर आरोपी बरगंडे याने फिर्यादीवर बलात्कार केला. जेव्हा नरळे परत आला तेव्हा बरगंडे बाहेर गेला. त्यावेळी नरळे यानेसुध्दा फिर्यादीवर जबरदस्तीने बलात्कार केला. त्यानंतर फिर्यादी महिला तुंगत येथे नातेवाईकांकडे गेली. त्यावेळी या प्रकरणाला वाचा फुटली आणि पुण्यातील बिबवेवाडी पोलीस ठाण्यात आरोपींविरुध्द फिर्याद दाखल करण्यात आली. तीच फिर्याद पुढे सोलापुरात फौजदार चावडी पोलीस ठाण्यात वर्ग करण्यात आली.

### तपास अधिकाऱ्याचा प्रताप

तपास अधिकारी विष्णू गायकवाड यांनी विरोधात सबळ पुरावे उपलब्ध नसल्याचे नमूद करून आरोपी बरगंडे यास गुन्ह्यातून वगळण्याचा अहवाल न्यायालयात पाठवला होता. याशिवाय आरोपी नरळे याच्याविरोधातील सामूहिक बलात्काराचे कलम कमी करून फसवणुकीचे किरकोळ कलम लावून न्यायालयात दोषारोप पत्र पाठवले होते.

### वकिलांचा युक्तिवाद

ॲड. विक्रांत फताटे यांनी पिडितेची बाजू मांडली. पिडितेने दोन्ही आरोपींविरुध्द सामूहिक बलात्कार केल्याची फिर्याद दिली, असून त्याप्रमाणे पिडितेने न्यायदंडाधिकाऱ्यांसमोर जबाब दिला आहे. मात्र तपास अधिकाऱ्याने आरोपींना मदत होईल असेच आरोपींच्या मित्रांचे जबाब नोंदवले. आरोपींना मदत होईल या अनुषंगाने पुरावे गोळा करून आरोपी बरगंडे यास गुन्ह्यातून वगळले; तर नरळे याच्याविरुध्द किरकोळ कलम लावून न्यायालयात दोषारोपपत्र पाठवले, असा युक्तिवाद केला.

### न्यायालयाचा आदेश

या प्रकरणाचा तपास वरिष्ठ आयपीएस अधिकाऱ्यांकडे हस्तांतरित करावा, संबंधित तपास अधिकाऱ्याने तपास करण्याचे अधिकार कोणत्याही अधिनस्त अधिकाऱ्याला देऊ नयेत; न्यायालयाच्या आदेशाची प्रत गृहमंत्री, कायदामंत्री आणि महिला आयोग यांना सादर करावी, पोलीस आयुक्त (सोलापूर) यांनी पिडितेला पुढील आदेश होईपर्यंत मोफत संरक्षण द्यावे, असा आदेश मुंबई उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने राज्याच्या पोलीस महासंचालकांना दिला.

---

## दत्तनगर येथे पदवीधर तरुणीची गळफास घेऊन आत्महत्या

✔ सुराज्य/सोलापूर

पदवीधर असलेल्या एका अविवाहित तरुणीने राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना दाजी पेठ परिसरातील दत्तनगर येथे गुरुवारी सकाळच्या सुमारास घडली. रूपाली इरप्पा संभारंभ (वय २३ रा. दत्तनगर) असे मयत झालेल्या तरुणीचे नाव आहे.

सकाळी ११ वाजेच्या सुमारास तिचा मृतदेह छताच्या पंख्याला ओढणीने गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आला. तिला फासातून सोडवून शासकीय रुग्णालयात दाखल केले असता ती उपचारापूर्वी मयत झाली. मयत रूपाली संभारंभ ही पदवीधर असून सध्या ती फॅशन डिझाईनचा कोर्स करीत होती. तिच्या वडिलांचे निधन झाल्यामुळे ती आई सोबत रहात होती.घरात आई विडी काम करीत असताना तिने हा प्रकार केला.या घटनेची नोंद जेलरोड पोलिसात झाली असून या मागचे कारण समजले नाही हवालदार चव्हाण पुढील तपास करीत आहेत.

---

## २ लाखांची लाच घेताना प्रदूषण नियंत्रण मंडळाचा अधिकारी गजाआड

### मोटारीत बसून लाच येताना रात्री अटक

✔ **सोलापूर** : साखर कारखाना डिस्टिलरी युनिटच्या परवान्याचे नुतनीकरण तसेच लोकांनी केलेल्या तक्रारींची दखल न घेण्यासाठी २ लाखाची लाच घेताना प्रदूषण नियंत्रण मंडळाचा उपप्रादेशिक अधिकारी अजित वसंतराव पाटील (वय ५० मूळ रा. धुळे, सध्या रा.सोलापूर) याला अँटीकरप्शनच्या पथकाने लाचेच्या रकमेसह अटक केली.

हा ट्रॅप बुधवारी रात्री १० वाजेच्या सुमारास सात रस्ता ते स्टेशन रोड रस्त्यावर लावण्यात आला होता. साखर कारखान्यातील डिस्टलरी युनिटच्या परवाना नूतनीकरण करण्यास मदत केल्याच्या मोबदला, कारखान्यातील हवा आणि पाण्याचे प्रदूषण होत असल्याबाबत लोकांनी केलेल्या तक्रारींची दखल न घेण्यासाठी तसेच कारखाना युनिटचे प्रस्ताव वरिष्ठ कार्यालयास सादर करण्यासाठी प्रदूषण मंडळातील अधिकारी अजित पाटील हा तक्रारदारास २ लाखाची लाच मागितली होती. तक्रारदाराने सोलापुरातील लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालयाशी संपर्क साधून अजित पाटील याच्या विरुद्ध तक्रार दिली होती. त्याप्रमाणे लाचलुचपत प्रतिबंधच्या पथकाने बुधवारी रात्री सात रस्ता ते स्टेशन रोड या मार्गावर सापळा रचला होता. तक्रारदाराच्या मोटारीत बसून लाचेची रक्कम स्वीकारत असताना पथकातील पोलिसांनी पाटील याला रंगेहात अटक केली. त्याच्या विरुद्ध सदर बझार पोलिसात गुन्हा दाखल केला. कारवाई चालू असताना आरोपी पाटील याची तब्येत अचानक बिघडली. त्यामुळे त्याला रुग्णालयात दाखल करण्यात आले. डिस्चार्ज घेतल्यानंतर त्याला न्यायालयासमोर हजर करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले.



ही कारवाई लाचलुचपत प्रतिबंधकचे उपअधीक्षक गणेश कुंभार, पो.निरिक्षक उमाकांत महाडिक, चंद्रकांत कोळी, हवालदार शिरीषकुमार सोनवणे, अतुल घाडगे आणि किणगी यांनी केली.

---

## नागपूर भूखंड घोटाळा प्रकरणात आयुक्त तेली-उगले यांचे नाव

### चौघांचे फोन रेकॉर्ड तपासण्याची दानवे यांची मागणी

✔ सुराज्य/सोलापूर

नागपूर सुधार प्रन्यास प्राधिकरणमधील भूखंड प्रकरणात आता सोलापूरच्या आयुक्त शीतल तेली उगले यांचे नाव आले असून त्यांच्यासह चौघांची चौकशी करून, त्यांचे फोन रेकॉर्ड तपासले पाहिजेत, अशी मागणी शिवसेनेचे विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी केली आहे.

सध्या नागपूर येथे हिवाळी अधिवेशन सुरू आहे. यामध्ये नागपूर भूखंड घोटाळा गाजत आहे. आता यात सोलापूरच्या आयुक्त शितल तेली उगले यांचे नाव दानवे यांनी घेतले आहे. ते म्हणाले, तत्कालीन सभापतींनी हा भूखंड देण्यासाठी नकार दिलेला असतानाही तत्कालीन नगरविकास मंत्री यांनी २० एप्रिल २०२१ रोजी अपील घेऊन, अंदाजे ८३ कोटी रुपये किंमतीचा हा भूखंड १६ बिल्डरांना २ कोटी रुपयांना भाडेतत्त्वावर देण्यासाठी आदेश दिला आहे. या प्रकरणात तत्कालीन सभापती दीपक म्हैसेकर, अश्विन मुदगळ, शीतल तेली उगले व मनोजकुमार सूर्यवंशी या चार अधिकाऱ्यांची चौकशी करून, त्यांचे फोन रेकॉर्ड तपासले पाहिजेत, अशी मागणी दानवे यांनी केली. या प्रकरणात २ अधिकारी हे आयएसएस आहेत. त्यामुळे त्यांनी तत्कालीन नगरविकास मंत्र्यांना माहिती दिली नव्हती का? याबाबतही चौकशी करण्याचे आदेश द्यावेत, असे दानवे यांनी म्हटले आहे.



**शासन जी आहे ती चौकशी करेल : उगले**

अंबादास दानवे यांनी केलेल्या मागणी संदर्भात संदर्भात महापालिकेच्या आयुक्त शितल तेली - उगले विचारले असताना मला अधिक माहिती नाही. त्याप्रकरणी आदेशानुसार शासन जी आहे ती चौकशी करेल. माझी तर बदली तीन वर्षांपूर्वी तिथून (नागपूर) झाली होती अशी प्रतिक्रिया त्यांनी पत्रकारांना दिली.

---

## तोतया शाळा तपासणी अधिकाऱ्यावर गुन्हा दाखल

✔ सुराज्य/सोलापूर

नांदेड येथील जिल्हा परिषदेत शाळा तपासणी अधिकारी असल्याचे सांगणाऱ्या महिलेसह दोघांविरुद्ध वळसंग पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत वळसंग पोलीस ठाण्यातील पोलीस अंमलदार विद्यासागर सोनकांबळे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून जाकिरा फिरदोस गफार शेख व शाहीद अल्लू खान (दोघे रा.क विभाग विडी घरकुल कुंभारी, ता.दक्षिण सोलापूर) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. एका गुन्ह्यामध्ये साक्षीदार म्हणून जाहिरा व शाहिद हे दोघे कार (एमएच.१३. डीई.१६३२) मध्ये बसून विडी घरकुल पोलीस चौकीत आले होते, त्यावेळी त्यांच्या गाडीवर महाराष्ट्र शासन नावाची पाटी होती. तेव्हा शाहीद खान यांनी जाकिरा या जिल्हा परिषद सोलापूरच्या आस्थापनेवर शाळा चेक करण्याचे काम करतात असे सांगितले. तेव्हा सोनकांबळे यांना संशय आला.



त्या महिलेकडे त्यांनी अधिक तपास केला असता,त्यांच्याकडे गव्हर्नमेंट ऑफ महाराष्ट्र,नांदेड जिल्हा परिषद यांच्या नावे आयडेंटी कार्ड मिळाले व त्यावर जाकिरा शेख यांचे छायाचित्र व नांदेडच्या शिक्षणाधिकाऱ्यांची सही होती.त्यांची नांदेड येथे चौकशी केली असता, नांदेड जिल्हा परिषद अंतर्गत त्या कार्यरत नसल्याचे व त्यांच्या जवळ बनावट ओळखपत्र असल्याचे स्पष्ट झाले. त्यावरून दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नेचा पुढील तपास पोसई शेख हे करित आहे.

---

## एक इंचही जागा महाराष्ट्राला देणार नाही

### कर्नाटक विधिमंडळात बोम्मईंचा ठराव एकमताने मंजूर

✔ **बंगळुरु** : कर्नाटकची बाजू भक्कम असून येथील जनतेचे हित जपण्यासाठी सरकार कटिबद्ध आहे. आपण कर्नाटकची एक इंचही जागा महाराष्ट्राला देणार नाही, या भूमिकेचा पुनरुच्चार कर्नाटकचे मुख्यमंत्री बसवराज बोम्मई यांनी केला.



पुढील काळात कर्नाटककडे कुणीही वक्रदृष्टीने पाहिलं, तरी कुठल्याही गोष्टींची पर्वा केली जाणार नाही, असा इशाराही बोम्मईंनी दिला. मुख्यमंत्र्यांनी सभागृहात महाराष्ट्रातील नेत्यांच्या वर्तनाचा निषेध करणारा ठराव मांडला असता तो एकमताने मंजूर करण्यात आला. बेळगावमध्ये कर्नाटक विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन सुरु आहे. येथील जनता आता महाराष्ट्र एकीकरण समितीचा तिरस्कार करू लागली असून महाराष्ट्रातील नेते सीमाभागातील वातावरण बिघडवत असल्याचा आरोप कर्नाटकचे मुख्यमंत्री बसवराज बोम्मई यांनी केला.

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्यासोबत झालेल्या बैठकीत कायदा - सुव्यवस्था अबाधित राखणे, दोन्ही राज्यात सलोखा राखणे, स्थानिक समस्यांवर समन्वयाने तोडगा काढणे, यासारख्या सूचना देण्यात आल्याचं बोम्मईंनी सांगितलं. सर्वोच्च न्यायालयात कर्नाटकाची बाजू मांडण्यासाठी मुकुल रोहितगी यांच्या नेतृत्वाखाली पाच वकिलांची समिती स्थापन करण्यात आली असल्याचेही ते म्हणाले.

---

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



माझ्या शेकोटीन शहरात काजळीकशी पसरेल ?

**कल्याण**
**100-18-170**

**मेन बाजार**
**470-15-456**

---

## शहराची कोरोना रुग्णसंख्या शून्यच; मात्र एका मृत्यूमुळे चिंता

### मयत रुग्ण विजापूरचा : मृत्यूनंतर अहवाल पॉझिटीव्ह

✔ सुराज्य/सोलापूर

चीनमध्ये पुन्हा वाढत्या कोरोनाच्या नव्या व्हेरिएंटच्या प्रादुर्भावामुळे जगभरात चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. असे असतानाच कोरोना मुक्त झालेल्या सोलापूर शहरात गुरूवारी एकाचा कोरोनाने मृत्यू झाल्याचा अहवाल प्राप्त झाला आहे. यामुळे शहरवासियांमध्ये पुन्हा एकदा कोरोनाची भिती निर्माण झाली आहे.

चीनमध्ये पुन्हा एकदा हाहाकार माजविलेल्या कोरोनाच्या नव्या व्हेरिएंटच्या प्रादुर्भावामुळे हजारो रुग्ण आढळून येत असताना देशात व राज्यातही खबरदारी घेण्यात येत आहे. शासनाच्या निर्देशानुसार यावर विविध उपाय योजना महापालिकेच्या आरोग्य विभागाकडून आखण्यात येत असतानाच कोरोनामुक्त झालेल्या शहरात गुरूवारी शहरात एक रुग्ण आढळला आणि त्याचा मृत्यूही झाला आहे.

शहरात आरोग्य विभागाने बुधवारी घेतलेल्या ८९ संशयितांच्या चाचणीत एकही रुग्ण आढळला नाही. मात्र कर्नाटक राज्यातून आलेल्या आणि जुना विडी घरकुल येथे नातेवाईकांकडे तीन- चार दिवसापासून राहत असलेल्या ६१ वर्षीय रुग्णाचा सिव्हीलमध्ये २० डिसेंबर रोजी रात्री ९ वाजता मृत्यू झाला. मृत्यूनंतर त्याचा कोरोना अहवाल पॉझिटिव्ह आढळून आला आहे. यामुळे महापालिका आरोग्य विभाग पुन्हा एकदा सतर्क झाले आहे. शहरात आणखी एकाचा बळी गेल्याने शहरातील बळींची संख्या आतापर्यंत १५१६ इतकी झाली आहे. मात्र सध्या शहरात एकही रुग्ण कोरोना ॲक्टिव्ह नाही, ही दिलासादायक बाब आहे.



**▸ त्या रुग्णास इतरही गंभीर आजार : आरोग्य अधिकारी**

सिव्हीलमध्ये उपचार घेणाऱ्या कोरोना बाधित एकाचा मृत्यू झाल्याचा अहवाल प्राप्त झाला आहे. मात्र तो रुग्ण विजापूरचा रहिवाशी आहे. त्या रुग्णालयाला त्या रुग्णास इतरही गंभीर आजार होते, अशी माहिती महापालिकेचे आरोग्य अधिकारी डॉ. बसवराज लोहारे यांनी दिली. शासनाच्या निर्देशानुसार महापालिकेच्या आरोग्य विभागाकडून आवश्यक त्या उपाययोजना व खबरदारी घेण्यात येत असल्याचेही त्यांनी सांगितले.

**▸ आरोग्य विभाग झाले सतर्क**

कोरोनाच्या नव्या व्हेरियंटच्या अनुषंगाने महापालिका प्रशासन आणि आरोग्य विभाग विविध उपाय योजना आखत आहे. यामध्ये कोरोना चाचण्या वाढविण्यात येत आहेत.कोरोना प्रतिबंधक लसीकरण न घेतलेल्या आणि बूस्टर डोस नसलेल्यांना आता लसीकरण आणि डोस देण्याची प्रक्रिया अधिक वेगाने राबविली जाणार असल्याचे आरोग्य प्रशासनाने सांगितले. नागरिकांनी कोरोनाच्या नियमांचे पालन करावे, असे आवाहनही पालिकेने केले आहे.

CMYK

# संकटाचे पुन्हा सावट

जगाचा जीवनगाडा आता कुठे रुळावर आलेला असताना तसेच अर्थव्यवस्थेची घडी बसत असतानाच कोरोनाच्या भुताचा पुन्हा उदय झाल्याने सारे जग परत एकदा हादरले आहे. अमेरिका व चीनमध्ये कोरोना संसर्गाचा विस्फोट होताच जागतिक आरोग्य संघटना चिंतेत पडली आहे. चीनमधील कोरोना रुग्णांची वाढती संख्या आणि दवाखान्यांमध्ये मृतांचा पडलेला खच याविषयीच्या ज्या बातम्या आणि व्हिडिओ व्हायरल होत आहेत, त्या पाहिल्यानंतर अख्ख्या जगाचे मन विषण्ण होऊन गेले आहे. चीनमधील हे भयावह दृश्य पाहिल्यानंतर भारताला सावध होणे आवश्यकच ठरते. कारण हा देश आपल्या शेजारी आहे. दररोज विमानाच्या प्रवासातून शेकडो चिनी नागरिक आपल्या देशात येत असतात. चीनमधील कोरोनाचा भडका पाहिल्यानंतर तिथल्या भारतीयांचा मायदेशी प्रवासही सुरू होईल. त्यातून एक जरी रुग्ण आला तर भारताची स्थिती बिघडवू शकते. मागील एक उदाहरण त्यासाठी पुरेसे आहे. दुबईतून एक रुग्ण आला. त्याच्यातून संसर्ग कसा फैलावला आणि देशाला त्याची किती किंमत मोजावी लागली हे सत्य भारतीय कदापिही विसरू शकणारच नाहीत. गर्दीच्या ठिकाणी मुखपट्टीचा वापर, लसीकरण पूर्ण करण्याबरोबरच अन्य उपाययोजना करण्याचा सल्ला केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने बुधवारी राज्यांना दिला. चीनमध्ये मोठी रुग्णवाढ नोंदविणाऱ्या ओमायक्रॉनच्या 'बीएफ.७' या उपप्रकाराचे भारतात तीन रुग्ण आढळले आहेत. आतापर्यंत गुजरातमध्ये दोन आणि ओडिशामध्ये एका रुग्णाची नोंद झाली आहे. त्याचा विचार करून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही देशातील स्थितीचा आढावा घेण्यासाठी उच्चस्तरीय बैठक घेतली. काळजी करत बसण्यापेक्षा काळजी घेणे आवश्यक असते, असे एक पथ्य डॉक्टरांकडून नेहमीच सांगितले जाते. त्यादृष्टीने मोदी सरकारकडून टाकले गेलेले हे



पाऊल योग्यच म्हणावे लागेल. कारण कोरोनाचा संसर्ग रोखण्यासाठी आपल्या हाती काही उपाययोजना आता आहेत, ज्या तीन वर्षांपूर्वी त्या नव्हत्या.देशात लसीकरणही मोठ्या प्रमाणात झाले आहे. त्यामुळे लस घेतलेल्यांच्या अंगी प्रतिकार क्षमता आहे. त्यामुळेच की काय? नीती आयोगाचे सदस्य डॉ. पॉल यांनी कोरोना गेलेला नाही पण आपल्याला भीतीचे काहीच कारण नाही, अशा शब्दात विश्वास व्यक्त केला. कोरोना प्रतिबंधक उपाययोजनांवर भर द्यायला हवा. गर्दीच्या ठिकाणी मुखपट्टीचा वापर करण्याबरोबरच वर्धक मात्रेसह संपूर्ण लसीकरणासाठी लोकांनी प्रयत्नशील राहायला हवे. सर्दी-ताप-खोकला आल्यास तातडीने चाचणी करून घ्यायला हवी. सार्वजनिक ठिकाणची गर्दी टाळायला हवी. चीनसह अन्य देशांतून येणाऱ्या प्रवाशांचे नमुने विमानतळावर तपासलेच पाहिजे. तिथे ढिसाळपणा असता कामा नये. देशात सध्या कोरोनाचे ३ हजार ४०८ उपचाराधीन रुग्ण आहेत. देशात कोरोनाची रुग्णसंख्या कमी असली तरी चीनसह अन्य देशांत मोठी रुग्णवाढ नोंदविण्यात येत आहे. गेल्या काही दिवसांपासून जगभरात कोरोनाचे सरासरी ५.९ लाख दैनंदिन रुग्ण आढळत आहेत. चीनमध्ये पुन्हा एकदा कोरोनाने थैमान घातले असताना जागतिक आरोग्य संघटनेच्या प्रमुखांनी त्याविषयी चिंता व्यक्त केली. रुग्णवाढीच्या पार्श्वभूमीवर आरोग्य संघटनेने चीनला सर्वाधिक फटका बसलेल्या ठिकाणी लसीकरण वाढवण्याचा सल्ला दिला आहे. दरम्यान चीनमध्ये मोठी रुग्णवाढ नोंदविणाऱ्या ओमायक्रॉनच्या 'बीएफ.७' या उपप्रकाराचे भारतात तीन रुग्ण आढळले आहेत. चीनमधील बदलती स्थिती आणि वाढत्या गंभीर आजारांमुळे जागतिक आरोग्य संघटनेला चिंता सतावत आहे, असे डब्लूएचओचे प्रमुख टेड्रोस सांगतात. सर्वाधिक धोका असणाऱ्या लोकांचे लसीकरण करण्यासाठी जागतिक आरोग्य संघटना चीनला मदत करत आहे. चीनने २०20 पासून देशात कडक निर्बंधांचा भाग म्हणून 'शून्य कोविड' धोरण स्वीकारले आहे. पण लोकांची वाढती नाराजी आणि अर्थव्यवस्थेवर परिणाम होत असल्याने सरकारने डिसेंबरच्या सुरुवातीला सूचना न देता अनेक निर्बंध शिथिल केले होते. पण यानंतर रुग्णसंख्येत वाढ झाल्याचे डब्लूएचओ सांगते. चीनच्या सरकारने संसर्ग क्षेत्रात लॉकडाऊनचे बंधन घालताच चिनी लोक रस्त्यावर उतरले. कारण जीवन जगण्याचा गंभीर प्रश्न उद्‌भवला होता. असणाऱ्यांना जीवन जगणे क्रमप्राप्तच असते पण आपत्तीही पहायला हवी. अशा कात्रीत चीन सापडला आहे. तेंव्हा भारताला विशेष काळजी घ्यावीच लागेल. गाफील राहून चालणार नाही.

सामाजिक

# शिधावाटप केंद्रावर 'भरड धान्य' मिळावे

**वर्ष २०२३ भरड वर्ष म्हणून साजरे केले जाणार आहे. संसदेच्या हिवाळी अधिवेशनात खासदारांसाठी भरड धान्यांच्या खाद्यपदार्थांचे विशेष भोजन आयोजित केले होते. संयुक्त राष्ट्रांनी पुढील वर्ष आंतरराष्ट्रीय 'भरड धान्य' वर्ष घोषित केले आहे.**

नाचणी, बाजरी, ज्वारी, बाजरी आदी भरडधान्ये आहार पौष्टिक बनवतात. भारतात कुपोषणाची समस्या मोठ्या प्रमाणात आहे. त्यात गर्भवती माता, नवजात बालके यांचा समावेश असणे तर क्लेशदायक आहे. खिशाला परवडत नसल्याने कित्येक जण पौष्टिकतेचा खजिना असणाऱ्या भरडधान्यांपासून वंचित राहतात. विशेषतः श्रमिक वर्ग अंगमेहनतीचे काम पुष्कळ करतो. उन्हात राबून तसेच सतत शारीरिक कसरतीने शरीराची अधिक झीज होत असते. ती भरून काढण्यासाठी पोषक आहार अनिवार्य असतो. पण अशा आहाराची आणि पोटाची गाठभेट होण्यातील प्रमुख अडथळा म्हणजे आर्थिक कमजोरी. शरीराला आराम मिळण्यासाठी शारीरिक कष्टकरी वर्गातील काही लोकांकडून मद्यपान केले जाते. त्यामुळे शारीरिक हानी होते. कुटुंबात वाद होतात, पैसा वाया जातो. उत्तम आहाराची सवय त्यांच्या नवीन पिढीला लावली तर मद्यापासून ती पिढी लांब राहील. विविध प्रकारच्या धान्यापासून दारू बनते. धान्य शिजवण्यासाठी गरिबांच्या चुलीवर यावे. त्या योगे सकस आहार त्यांना मिळेल. चांगले जेवण जेवावे असे कुणाला नाही वाटत? सर्वांनाच तसे वाटते. तो मानवी स्वभाव आहे. त्यामुळे ते नैसर्गिक आहे. पण जे निसर्ग निर्मित आहे. ते खाऊन स्वतःचे शरीर तंदुरुस्त ठेवण्यात येणारी अडचण समोर मिळेल ते खाऊन भुकेची आग शांत करण्यास भाग पाडते. 'भुकेला कोंडा आणि निजेला धोंडा' हे वाक्य येथे लागू पडते.

खेळाडू मग ते कोणत्याही मैदानी खेळाशी निगडित असो. त्यांचा सकस, पौष्टिक आहारावर सर्वाधिक भर असतो. कारण त्यावरच त्यांची मदार असते. खेळाडूंना शारीरिक स्तरावर सशक्त बनवण्यासाठी भरड धान्य देणे शक्य आहे का? याचा अभ्यास व्हावा. भारत आंतरराष्ट्रीय स्तरावर शेजारील देश चीनच्या तुलनेत मागे आहे. भारताने पुढे येण्यासाठी दर्जे दार आहाराच्या माध्यमातून पाऊल टाकले पाहिजे. सैन्य पोटावर चालते असे म्हटले जाते. खेळाडूंचेसुद्धा तसेच आहे.

देशात आहाराच्या स्तरावर पाहण्यास मिळत असलेला विरोधाभास दूर व्हावा. संपूर्ण देश सुदृढ, निरोगी होण्यासाठी गरिबांच्या पोटाला पौष्टिक अन्न मिळाले पाहिजे. केंद्राने राज्यांच्या साहाय्याने गरीब जनतेपर्यंत भरड धान्यांच्या माध्यमातून पोषक, चौरस आहार मिळवून देण्याविषयी ठोस निर्णय घ्यावा. गरिबांसाठी ही एक प्रकारची मेजवानी असेल. शिधावाटप केंद्रावर तांदूळ, गहू अल्पदरात मिळतात. त्यात भरड धान्याची भर पडली तर गरिबांच्या चेहऱ्यावरील समाधान अनमोल असेल. त्यामुळे घोषित केल्यानुसार खऱ्या अर्थी आगामी वर्ष सार्थकी लागेल. लोकप्रतिनिधी तुपाशी आणि जनता उपाशी असे होऊ नये.



भारत कृषी प्रधान देश आहे. शेतीचे चोख नियोजन केले तर संपूर्ण जगाची अन्नधान्य, भाजीपाला, फळे आदी शेतमालाची आवश्यकता एकटा भारत पुरवू शकतो. एवढी क्षमता भारतात नक्कीच आहे. त्यायोगे कृषी प्रधान देश म्हणून भारत पुन्हा उदयास येईल. मात्र, या सर्वांसाठी नितांत आवश्यकता आहे ती एकमेकांत ताळमेळ असणे आणि उत्तम नियोजन असणे. रशिया-युक्रेन जगाला विपुल प्रमाणात गहू पुरवतात. भारतही त्यांच्याकडून गहू आयात करतो. हे त्या दोन देशांत युद्ध चालू झाल्यावर अनेक भारतीयांना प्रथमच कळले असेल. अन्यथा रशियाकडून भारत संरक्षणविषयी सामुग्री आधीपासून घेत आला आहे, हेच अनेकांना ज्ञात आहे. भारत गव्हाचे उत्पादन घेण्यात मागे का? हा प्रश्न आल्याविना रहात नाही.

नैसर्गिक शेतीद्वारे पिकवण्यात येत असलेल्या शेतमालाला जगभरात प्रचंड मागणी आहे. शेतीकडे कोत्या नजरेतून न पाहता व्यापक नजरेतून पाहिले तर त्याचा लाभच लाभ आहे. एक म्हणजे आपसूकच शारीरिक कसरत होते, दुसरे म्हणजे त्यामुळे शरीर सुस्त न राहता तंदुरुस्त राहते., नैसर्गिक शेतीतून मिळणाऱ्या कसदार धान्यामुळे सामाजिक आरोग्य बलवान होते, छोट्या शारीरिक कुरबुरी पालापाचोळ्याप्रमाणे उडून जातात, त्या धान्यावर लोकांचा विश्वास बसतो, चार पैसे गाठीला मिळतात, कोणापुढे हात पसरावे लागत नाहीत, नैसर्गिक शेतीमुळे अन्नसाखळी उत्तम राहते. कारण यातील सर्व सूत्रे निसर्गाला अनुकूल असतात. त्यामुळे निसर्गाचे देणे सढळ हस्ते कसे असते? हे अनुभवता येते. निसर्ग चक्र प्रतिकूल असूनही पुन्हा शेतीच करण्याचा निर्णय घेणे यासाठी शेतकरी वर्गाचे कौतुक करावे तेवढे थोडेच आहे. शेतीशी काडीमात्र संबंध नसणाऱ्या शहरवासीयांच्या पोटाची खळगी केवळ आणि केवळ शेतकरी बंधूंमुळेच भरत आहेत, याचा सार्थ अभिमान आहे. केवळ एकच नम्र विनंती आहे की, नैसर्गिक शेतीला प्राधान्य द्यावे.

संगणकीय युगाचा प्रभाव वाढत आहे. अशा आधुनिक युगात कुठे शेती करायला सांगत आहात? असे सांगणे म्हणजे मूर्खपणाचे लक्षण आहे, असा एक सूर ऐकू येतो. पण जे या आधुनिक युगाचे शिलेदार म्हणून मिरवतात. त्यांचा आहार शेतमालावरच अवलंबून आहे, याचा त्यांना सोयीस्कर विसर पडतो. युग संगणकीय तंत्रज्ञानाने आधुनिक झाले असले तरी या आधुनिकतेचे गंभीर दुष्परिणाम किती आणि कोणते आहेत? तासन्‌तास संगणकासमोर रहावे लागत असल्याने मेंदू, डोळे, मणका, कंबर यांवर अतोनात ताण येतो, नोकरीवर टिकून राहण्याचा-कामाचा सततचा मानसिक तणाव, अवेळी न्याहारी-जेवण आदी सर्वांत माणसाच्या जिवाला शांतता-समाधान आहे कुठे? याचे निश्चित उत्तर संगणकीय युगाकडे नाहीच आणि कुठल्या तोंडाने शेती करू नका वगैरे फुकटचे शहाजोग सल्ले देऊन लोकांचा बुद्धिभेद करत आहेत? काय करायचं आणि काय नाही करायचं याचा विचार करण्याचे स्वातंत्र्य घटनेने प्रत्येक नागरिकाला दिले आहे. अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा, सारासार विवेकबुद्धीचा लोक नक्कीच उपयोग करून योग्य तोच निर्णय घेतील. कोणत्याही क्षेत्रास उणे लेखण्याचा मुळीच मानस नाही. पण जे समाजात चालू आहे ते वस्तुनिष्ठपणे न मांडता त्यावर पांघरून घालणेसुद्धा चुकीचे आहे. यातून योग्य-अयोग्य काय? ते ठरवण्याचा अधिकार लोकांकडे आहेच.

**- जयेश राणे, मुंबई.**

टुडेज ब्लॉग

## आईची महती जगाला सांगणारे 'साने गुरुजी'

**साने गुरुजींचा जन्म दिवसाच्या निमित्ताने -**

आजच्याच दिवशी १८९९ साली कोकणातले पालघड या गावी साने गुरुजींचा जन्म झाला. त्यांचे वडील सदाशिवराव हे गावातील खोत होते. आई यशोदा साने ह्या होत्या. यशोदा सानेंनी साने गरुजींच्या वर अतिशय प्रभावी संस्कार केले. साने गुरुजींच्या सारखे अजोड व्यक्तिमत्व घडविणारी ती स्त्री सामान्यातील असामान्य अशी होती. यशोदा सानेंनी साने गुरुनींना दिलेल्या संस्कारावरच त्यांनी अलौकिक कार्य केले. त्यांच्या आईने त्यांना केवळ माणसा वरच नव्हे तर वृक्ष, वेली व पशुपक्षावरही प्रेम करण्यास शिकविले होते. साने गुरुजी हे तिसरे अपत्य होते. गुरुजींच्या वयाच्या १८ वर्षी त्यांच्या आईचे छत्र हरपले. गुरुजींनी बालपणात अतिशय गरिबीत दिवस काढले. प्राथमिक शिक्षण गावातील पालघड येथे झाल्यानंतर ते दापोली येथे शिक्षणासाठी गेले. त्यानंतर ते सातारा जिल्ह्यातील औंध येथे पुढील शिक्षणासाठी राहिले होते. तेथे प्लेगची साथ आल्याने त्यांना वसतिगृह सोडावे लागले. त्यानंतर त्यांनी पुण्यात नूतन मराठी विद्यालय येथे प्रवेश घेतला. संस्कृत व मराठी विषय घेऊन ते पदवीधर झाले. १९१७ साली त्यांनी मॅट्रिकची परिक्षा दिली होती. पुण्यात त्यांनी आताच्या सर परशुराम भाऊ कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. एकूणच एम. ए. पर्यंतचे शिक्षण त्यांनी अतिशय खडतर परिस्थितीत पार केले. त्यानंतर अमळनेर येथे त्यांनी १९२४ ते १९३० या कालावधीत शिक्षकाची नोकरी सुद्धा केली. तेथे त्यांनी वसतिगृहातील विद्यार्थ्यांना स्वालंबनाचे धडे शिकविले. तेथे असताना त्यांनी प्रताप तत्वज्ञान केंद्रात तत्वज्ञानाचा अभ्यास केला. १९२८ साली त्यांनी विद्यार्थी नावाचे एका मासिक काढले होते. ते अतिशय लोकप्रिय झाले. १९३० साली स्वातंत्र्याच्या चळवळीत त्यांनी सक्रिय भाग घेतला होता. या वेळी त्यांनी नोकरी सोडून दिली. त्यांनी कॉंग्रेस नावाचे साप्ताहिक काढले होते. अनेक वेळा त्यांना तुरुंगात जावे लागले. शेतकऱ्यांची कर्जमाफी व्हावी म्हणून त्यांनी प्रयत्न केले होते. त्रिचनापल्ली येथे असताना त्यांनी बंगाली व तामीळ भाषा शिकल्या १९३६ साली. फैजपूर येथे कॉंग्रेसचे अधिवेशन भरले होते. त्यात त्यांनी सक्रिय भागही घेतला होता. राष्ट्रसेवा दलाची त्यांनी स्थापना केली होती साने गुरुनींना मुलांचे भारी वेड होते. मुले ही देवघराची फुले अशी त्यांची समजूत होती. तुरुंगात असताना त्यांनी कैद्यांना श्यामच्या गोष्टी सांगितल्या होत्या. त्यावरच 'शामची आई' हे पुस्तक निघाले. त्या पुस्तकाच्या अनेक आवृत्त्या निघाल्या. अनेक भाषात त्याची भाषातंरे झाली. या पुस्तकाची प्रस्तावना आचार्य अत्रेंनी लिहली होती. त्यात त्यांनी 'शामची आई' हे पुस्तक म्हणजे मातृप्रेमाचे महन मंगल स्रोत्र आहे, असे म्हटले होते. साने गुरुजींनी आपल्या भावनेनी ओथंबलेल्या लेखणीने लिहिलेल्या, मराठी सारस्वताच्या दरबारात आईची महती सांगणारे हे पुस्तक म्हणजे साहित्याचा एक अनमोल ठेवा आहे. दारिद्र्यात झगडण्याचे विलक्षण सामर्थ्य व आत्मविश्वास या दोन गोष्टी साने गुरुजींच्या आईने म्हणजेच यशोदा सानेंनी साने गुरुजींना दिल्या. कोकणातली एक सर्वसामान्य कुटुंबातील महिला आपल्या संस्कृतीच्या अनमोल ठेव्याने मराठी माणसाच्या स्मृतीत कायमची राहील. साने गुरुजींनी भारतीय संस्कृतीवर आधारित ग्रंथही लिहिला होता. स्वातंत्र्यानंतर साने गुरुजींनी समाजवादी चळवळीत काम केले. यावेळी त्यांना एस. एम. जोशी, मधू लिमये, ना. ग. गोरे यांचा सहवास लाभला. 'साधना' हे साप्ताहिकही त्यांनी काढले. आपली पुतणी सुधा हिला लिहिलेली पत्रे त्यांनी साधनेतून प्रसिद्ध केली. ह्या पत्रातून त्यांनी निसर्ग व जीवनातील विविध गोष्टींचे दर्शन घडविले. साने गुरुजींनी एकूण ७३ पुस्तके लिहिली. १९४६ साली चौथ्या कुमार साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदावरून बोलताना नव्या पिढीला त्यांनी प्रेरक विचार व्यक्त केले होते.




साने गुरुजींनी राजकीय, शैक्षणिक, सामाजिक, साहित्य अशा सर्वच क्षेत्रात काम केले. त्यांच्या 'शामची आई' या पुस्तकावर आचार्य अत्रेंनी १९५३ साली चित्रपटही काढला होता. त्यास १९५४ साली भारतीय केंद्र शासनातर्फे दिला जाणारा पहिला राष्ट्रीय पुरस्कार मिळाला होता. साने गुरुजींच्या स्मरणार्थ रायगड जिल्ह्यात माणगाव नजीक वडघर येथे राष्ट्रीय स्मारक संस्था स्थापना झाली. स्वातंत्र्यानंतर त्यांना सभोवतालच्या परिस्थितीने विषण्ण केले. अखेर त्यांनी आपल्या जीवनाचा शेवट करण्याचा निर्णय घेतला. वयाच्या केवळ ५१ व्या वर्षी त्यांनी या जगाचा निरोप घेतला. साने गुरुजींच्या जन्मदिनानिमित्त त्यांना प्रणाम.

**- शांताराम वाघ, पुणे.**

जन्म हा अखेरचा

## धर्माचारस्थल - ५



गाईने गवत खाल्ले तर त्या गवताचे रुपांतर अमृतासमान दुधात होते. तेच दूध जर सापाला पाजले तर त्याचे रुपांतर विषात होते. त्याप्रमाणे योग्य माणसाला दान दिले तर ते सत्कारणी लागते आणि अपात्र माणसाला दान दिले तर ते वाया जाते.

दानानंतरचा धर्म आहे 'पूजा'. एक बाह्य पूजा असते तर दुसरी अंतरंग पूजा असते. आपण इष्टलिंगाची पूजा करतो, त्याला अभिषेक करतो, गंध लावतो, बेल वाहतो. तन्मय होऊन इष्टदेवतेची जी अर्चना केली जाते, तिला 'पूजा' म्हणतात. ज्याची जशी इष्ट देवा असेल त्याने तिची तशी पूजा केली पाहिजे. इष्टदेवतेची मूर्ती दिसायला स्थूल असली तरी तिच्या ठिकाणी आपली भावना जागृत झाल्यामुळे तिच्यात चैतन्याची प्रचिती येते. चैतन्य सर्वत्र व्याप्त आहे. ते जसे अत्यंत सूक्ष्म अशा अणूत आहे, तसेच अत्यंत मोठ्या वस्तूत आहे. ते जडात आहे तसेच चेतनात देखील आहे. जेथे मनुष्याची भावना एकवटते, तेथे सत्-चित्-आनंदरुप परमात्मा प्रकट होतो. म्हणून एके ठिकाणी भावना केंद्रीत करणे हा भगवंताच्या साक्षात्काराचा मार्ग होय. जोपर्यंत तुम्हांला निर्गुण-निराकाराची पूजा कशी करावी याचे ज्ञान नाही, जोपर्यंत तुमचे ज्ञान निराकाराची कल्पना करु शकत नाही. तोपर्यंत भगवंताच्या सगुण-साकार रुपाची पूजा तुम्ही करायला हवी. **(क्रमश:) – काशी जगद्‌गुरु डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी.**

## आरोग्यदायी तुळस घरी आणा

जनमानस

भारतातील कॉन्व्हेंट शाळांमध्ये ख्रिस्ती धर्मियांपेक्षा हिंदूंचीच मुले अधिक शिकत असल्याने या मुलांचे कुटुंबीय ख्रिसमस सण सुद्धा दिवाळी दसऱ्याप्रमाणेच साजरा करू लागले आहेत. ख्रिसमसच्या निमित्ताने घरी ख्रिसमस ट्री आणून त्यावर सजावट केली जाते; मात्र हा घरी आणला जाणारा ख्रिसमस ट्री सोबत अनेक आजारांनाही घेऊन येत असल्याचे संशोधनाअंती सिद्ध झाले आहे.



संशोधक डॉ. लॉरेन्स कुरलेंडरकी यांच्या मते २५ डिसेंबरच्या दरम्यान उत्सव काळात श्वसनासंबंधी रोगांच्या तक्रारींमध्ये प्रचंड वाढ झाल्याचे दिसून येते आणि यामागे ख्रिसमस ट्री मुख्य कारणीभूत असतो. त्यांनी मांडलेल्या अहवालात स्पष्ट नमूद केले आहे की, ख्रिसमस ट्रीमुळे खोकला, श्वास घेण्यात अडचण तसेच सुस्ती आणि अनिद्रा यांसारख्या आरोग्य समस्या निर्माण होऊ शकतात, हा ख्रिसमस ट्री कधी कधी धोकादायक आणि दीर्घकालीन रोगांचे निमित्तही होऊ शकतो. या झाडाला अनेक दिवस घरात ठेवल्यामुळे घरात रोगकारक जिवाणूंची जलदगतीने वृद्धी झाल्याचे लक्षात आले आहे. ज्यामुळे ब्रॉंकाइटिस आणि न्यूमोनिया यांसारखे गंभीर आजार उद्‌भवू शकतात. त्यामुळे ख्रिसमसला रोगदायी 'ख्रिसमस ट्री' घरी आणण्यापेक्षा 'आरोग्यदायी तुळस' आणून दारी लावण्याची शिकवण मुलांना द्या. दारात तुळस लावण्यामागील शास्त्र आणि त्यामुळे आपल्याला होणारे लाभ मुलांना समजावून सांगा.

**- जगन घाणेकर, मुंबई.**

## पुन्हा एकदा काळजी घेणे आवश्यक

चीनमध्ये व जगात कोरोना वाढत असल्याच्या बातम्या असून सारे काही सुरळीत होत असताना हे काय घडत आहे? सारे काही सुरळीत झाले असताना पुन्हा एकदा काळजी घेणे आवश्यक आहे. मास्क, सॅनिटायझर व योग्य अंतर या गोष्टी पुन्हा एकदा करणे गरजेचे आहे. आता कोरोनाची लाट कोणालाही परवडणार नाही.

**- प्र. मु. काळे, नाशिक.**

# संकटात दिलासा मिळाला

**माझी मावशी शालन विलास शियेकर ही वारकऱ्यांच्या एका गटाबरोबर पंढरपूरला येत असताना सांगोल्या जवळील जुनोनी येथे एका खाजगी वाहनाने या गटाला धडक दिली त्यात सात जण मरण पावले आणि पाच जण जखमी झाले. या घटनेत जखमी झालेल्या पाच जणात माझ्या मावशीचा समावेश होता आणि मेंदूला मार लागल्याने ती गंभीर जखमी होती. त्या अवस्थेत तिला सोलापूरच्या अश्विनी रुग्णालयात उपचारार्थ दाखल करावे लागले.**

कोल्हापूर जिल्ह्यातील करवीर तालुक्यातले जठारवाडी गावचे सचिन पाटील यांनी या सगळ्या भयंकर संकटाची हकिकत सांगितली. एक तर कोल्हापूर जिल्ह्यातील आम्हां लोकांना सोलापूरसारख्या ठिकाणी एका रुग्णालयात येऊन राहावे लागले. येथे आमच्या परिचयाचे कोणी नाही आणि प्रदीर्घ काळ चालणाऱ्या उपचाराचा खर्च सहन करण्याची सुद्धा आमची ताकद नाही. माझ्या मावशीचा जिवाचे संकट तर मोठे होतेच परंतु हे आर्थिक संकट आमच्यासाठी फार अवघड होते. माझ्या मावशीची थोडी फार जमीन आहे, परंतु दवाखान्याचे बिल एवढे प्रचंड आहे की सगळी जमीन विकली तरीही त्याची भरपाई आम्ही करू शकत नाही. सोलापूरच्या अश्विनी रुग्णालयात मेंदू विकारासाठी असलेल्या अतिदक्षता कक्षात दीड महिना एक रुग्ण राहतो. त्याचा खर्च काय असेल याचा विचारसुद्धा आपण करू शकत नाही.

सोलापूरच्या लोकमंगल फाउंडेशनचे कर्मचारी यांनी आमच्या मावशीच्या प्रकृतीची विचारपूस करण्यासाठी रुग्णालयाला भेट दिली. त्यानंतर महाराष्ट्राचे आरोग्यमंत्री तानाजी सावंत यांचे सहकारी धनंजय सुतार यांनी येऊन चौकशी केली होती आणि आमचे या रुग्णालयाचे सारे बिल राज्य सरकारच्या मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून दिले जाईल अशी तजवीज केली होती. त्यामुळे तर मोठा दिलासा मिळालाच परंतु लोकमंगल फाउंडेशनचे कर्मचारी यांनी आमच्या जेवणाची सोय काय आहे. याची चौकशी केली आणि आमचा दुपारचा डबा लोकमंगल





फाउंडेशनच्या अन्नपूर्णा योजनेतून पाठवला जाईल अशी व्यवस्था केली. आमच्यापैकी दोघेजण कायम तेथे मुक्कामाला असतात. त्यांच्या जेवणाच्या खर्चाचा विचार केला तरी हा सारा खर्च जवळपास २५-३० हजारापर्यंत गेला असता. परंतु दुपारच्या जेवणाची व्यवस्था अन्नपूर्णा योजनेतून आणि सायंकाळच्या जेवणाची व्यवस्था रॉबिनहूड संस्थेकडून झाली आणि आम्हांला मोठा दिलासा मिळाला. या दोन संस्थाकडून न चुकता दररोज आम्हांला डबे मिळतात. डब्यातले जेवण चांगले असते. हॉस्पिटलच्या समोर असलेल्या एका दुकानात बरोबर वेळेवर डबे आलेले असतात. आम्ही ते घेतो आणि त्यामुळे आमची जेवणाची सोय होते. आमदार सुभाषबापू देशमुख यांच्या प्रेरणेने सुरू असलेल्या अन्नपूर्णा योजनेतून आम्हांला ही जी माणुसकीची वागणूक मिळाली ती खरोखरच वाखाणण्याजोगी आहे असे सचिन पाटील म्हणाले. लवकरच माझ्या मावशीची सुटका होईल आणि तिचे यजमान विलासराव शियेकर यांच्यासोबत आम्ही तिला घरी नेऊ. तेव्हा आम्हांला या माणुसकीच्या डब्याची जन्मभर आठवण राहील.

## पौष महिन्याचे महत्त्व



हिंदू कॅलेंडरनुसार वर्षातील दहाव्या महिन्याचे नाव पौष. या महिन्यात सूर्याची पूजा केली जाते. उद्यापासून पौष महिना सुरू होत आहे. या महिन्यात शुभकार्य केले जात नाही. लग्नकार्यही केली जात नाहीत. हा महिना सूर्य देव आणि नारायण यांच्या उपासनेचा महिना म्हटले जाते. पौष महिन्यात सूर्य देवाच्या पूजेचे विशेष महत्त्व आहे. त्यामुळे या महिन्यात पूजा कशी करावी व त्याचे महत्त्व काय हे खाली दिले आहे.

पौष महिन्यात सूर्यपूजेला विशेष महत्त्व आहे. या महिन्यात सूर्यदेवाची 'भग' नावाने पूजा करावी. 'भग' हे नाव भगवंताचे रूप मानले जाते. पौष महिन्यात सूर्याला अर्घ्य अर्पण करून उपवास करण्याला विशेष महत्त्व असते. याशिवाय पौष महिन्याला पितरांच्या मुक्तीचा महिना म्हटले जाते. हा छोटा पितृ पक्ष मानला जातो. वास्तविक पौष महिन्यात सूर्य धनु राशीत प्रवेश करतो. सूर्य धनु राशीत प्रवेश करताच सर्व शुभ कार्य थांबतात. सूर्य धनु राशीत प्रवेश करताच पिंड दानाचे महत्त्व वाढते. पौष महिन्याबाबत शास्त्रात सांगितले आहे की या महिन्यात ज्या पूर्वजांचे पिंडदान केले जाते, ते लगेच वैकुंठ लोकात निवास करतात. या महिन्यातील प्रत्येक रविवारी व्रत व उपवास करून तीळ व तांदळाची खिचडी खाल्ल्याने मनुष्य तल्लख बनतो.

**पौष महिन्यात हे करा-** दररोज स्नान केल्यानंतर सूर्यदेवाला जल अर्पण करावे. तांब्याच्या भांड्यात शुद्ध पाणी, लाल चंदन आणि लाल रंगाची फुले टाकून नियमितपणे सूर्यदेवाला जल अर्पण करा. सकाळी जितक्या लवकर अर्घ्य दिले जाते तितके ते अधिक चांगले. त्यामुळे कोणत्याही परिस्थितीत सकाळी ९ वाजेपर्यंत अर्घ्य द्यावे. अर्घ्य अर्पण करताना 'ओम आदित्याय नमः' चा जप करा. काही वेळ गायत्री मंत्राचा जप करा. या दिवशी स्नान करताना पाण्यात थोडे गंगेचे पाणी मिसळावे आणि नंतर श्री नारायणाचे नामस्मरण करून स्नान करावे. याशिवाय गूळ, लाल मसूर, तांबे, तीळ इत्यादींचे दान करा. लाल रंगाचे कपडे गरजूंना दान करा. पौष महिन्यात साखरेऐवजी गुळाचे सेवन करणे चांगले असते. या महिन्यात थंड पाणी वापरणे आणि जास्त जेवण करणे हानिकारक मानले जाते.

**- गायत्री अघोर, सोलापूर .**

सुराज्य सोलापूर हे दैनिक मुद्रक, प्रकाशक राकेश हरिपंत टोळ्ये यांनी सह्याद्री पब्लिशर्स, १५७/१५८, औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तेथे आणि ६०६/७/८, नारायण पेठ, पुणे-३० येथून एकाचवेळी प्रकाशित केले. सोलापूर मुख्य कार्यालय - फोन-०२१७-२६०७२०१, फॅक्स-०२१७-२६०७२०२, पुणे शहर कार्यालय - फोन/फॅक्स - ०२०-२४४६४७५५. I R. N. I. NO. MAHMAR / २००२/९७०७/२००३ I Email - dailysuraajya@gmail. com संस्थापक - स्व. राजेश विष्णूपंत कोठे, संपादक - राकेश टोळ्ये.



## बाल नंदीध्वजधारकांनी केला श्री सिद्धरामेश्वरांचा जयघोष

सुराज्य/सोलापूर

छोट्या आकाराचे नंदीध्वज, श्री सिध्दरामेश्वरांची पालखी, अक्षता सोहळा, होम प्रदीपन असे असे श्री सिध्दरामेश्वर यात्रेतील सर्व प्रसंग साकारत बाल नंदीध्वजधारकांनी ग्रामदैवत श्री सिध्दरामेश्वर यांचा जयघोष केला. निमित्त होते पुणे सेवासदन संस्था सोलापूर शाखेच्या शतक महोत्सवी वर्षानिमित्त सादर करण्यात आलेल्या 'मिले सुर मेरा तुम्हारा' या भारतीय संस्कृतीपर प्रादेशिक नृत्यांच्या कार्यक्रमाचे. पुणे सेवासदन संस्था शाखा सोलापूरच्या शतक महोत्सवानिमित्त सेवासदन प्रशालेत गुरुवारी अर्पित कथ्थक नृत्यालय आयोजित 'रमाबाई रानडे जीवनपट' व 'मिले सुर मेरा तुम्हारा' हा प्रादेशिक नृत्यांचा कार्यक्रम उत्साही वातावरणात झाला. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून सोलापूर जिल्हा परिषदेच्या माध्यमिक वेतन विभागाचे अधीक्षक प्रकाश मिश्रा, लेखक पराग फडके, कमर्शियल आर्टिस्ट महेंद्र दीक्षित, संस्थेच्या अध्यक्षा शीला मिस्त्री, सचिवा वीणा पतकी, संचालक प्रा. डॉ. श्रीकांत येळेगावकर उपस्थित होते. प्रारंभी अर्पित कथ्थक नृत्यालय आयोजित रमाबाई रानडे जीवनपट दाखवण्यात आला. यात रमाबाई रानडे यांचे बालपण, त्याकाळी विधवांवर असलेले सामाजिक प्रतिबंध, रमाबाई रानडे यांच्या पतीने त्यांना दिलेली शिक्षणाची शिदोरी, स्त्री शिक्षणासाठी त्यांनी केलेले कार्य असे प्रसंग दाखवण्यात आले.

# मराठा सेवासंघाच्या परभणीतील महाअधिवेशात सोलापूरच्या दोन सुपुत्राचा सन्मान

## दत्ता मुळे आणि श्रीकांत मोरे यांचा होणार गौरव

सुराज्य/सोलापूर

मराठ सेवा संघाचे परभणी येथे तीन दिवस राज्यस्तरीय महाधिवेशन होणार आहे. या अधिवेशात सोलापूरचे मनोरमा ग्रुपचे श्रीकांत मोरे आणि बिल्डर असोसिएशनचे राज्यअध्यक्ष दत्तामुळे यांना राज्यस्थरीय पुरस्कार देऊन गौरव करण्यात येणार आहे.

परभणी मराठा सेवा संघाच्यावतीने २३ते २५ डिसेंबर असे तीन दिवस पाथरी रोडवरील राजलक्ष्मी लॉन्स येथे राज्यस्थरीय महाअधिवेशन होणार आहे. मराठा सेवा संघाचे संस्थापक अध्यक्ष पुरूषोत्त खेडेकर यांच्या मार्गदर्शना खाली हे अधिवेशन होत आहे. स्वागताध्यक्ष कृषीभुषण कांतरा देशमुख आहे तर परभणी सेवा संघाचे जिल्हाध्यक्ष विठ्ठल भुसारे यांच्या संयोजनात हे आधिवेशन होणार आहे. २५ डिसेंबरय रोजी पुरूषोत्तम खेडेकर यांच्या प्रमख उपस्थित सांयकाळी समारोप होणार आहे. यावेळी नेताजी गोरे, टी.आर गायकवाड, अरविंद गावंडे, अशोक महाले वर्षा धाबे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. या समारोपाच्या सत्रात सोलापूरचे श्रीकांत मोरे यांनी मनोरमा परिवाराच्या माध्यमातून सहकार आणि सामाजिक क्षेत्रात केलेल्या उल्लेखनिय कार्यमुळे तर बिल्डर असोसिएनच्याचे राज्यअध्यक्ष दत्ता मुळे यांचा गौरव केला जाणार आहे.

२३ डिसेंबर रोजी सकाळी अभिवादन रॅली जिजाऊ मंदिरा पासून काढली जाणार आहे. दुपारी शोभा यात्रा ग्रंथदिडी निघाणार आहे. रात्री इंडियन आयडॉल फेम सूर सध्या हा सांस्कृतीक कार्यक्रम होणार आहे. २४ डिसेंबर रोजी सकाळी १० विविध मान्यवरांच्या उपस्थित उद्‌घाटन त्यानंतर शेतीचे वास्तव व दिशा, नवसमाज आणि शिवधर्माचे आचरण, एक पाऊल आर्थिक साक्षरतेकडे शिक्षणातील बदल व देश विदेशातीलील संधी या विषयावर चर्चा होणार आहेत.

रात्री आठ वाज६ता लोककलावंतांच्या नजरेतील संगीतसूर्य केशवराव भोसले हा सांस्कृतीक कार्यक्रम तर रविवार २५ डिसेंबर सकाळ १० वाजता सांस्कृतीक कार्यक्रम होणार आहे त्यानंतर सकाळी वाजल्या पासून चार्च सत्र होणार आहेत यामध्ये मराठा सेवा संघ विचार च कार्य, कुणबी मराठा समाजसाठी सारथी संस्थेचे योगदान, मराठा मुहला, कुंटूब- समाजभान व उद्यमशिलता, राजसत्ता, लोकशाही व वर्तमानतील राजकारण या विषयावर विविध वक्ते मार्गदर्शन करणार आहेत. सायंकाळी ४ ते ६ वाजता समारोपाचे सत्र होणार आहे. समाज बांधवानी उपस्थित राहवे असे आवाहन संयोजन समितीच्या वतीने केले आहे.

## भवानी पेठ परिसरातील वैदू वस्तीत लागली आग; प्रापंचिक साहित्य जळून खाक

सोलापूर : शहरातील भवानी पेठ परिसरात असलेल्या वैदूवस्तीत गुरुवारी दुपारी पावणे दोन वाजण्याच्या सुमारास अज्ञात कारणावरून झोपड्यांना आग लागली.मोठ्या प्रमाणात घरगुती व प्रापंचिक साहित्य जळून खाक झाले.

या घटनेची हकीकत अशी की, भवानी पेठेत वैदू समाज मोठ्या संख्येने राहतो. या ठिकाणी बरीच घरे ही जवळजवळ आहेत. गुरुवारी दुपारी अचानक अज्ञात कारणाने आग लागली.घरे जवळ-जवळ असल्याने आग भडकली. या भागातील माजी नगरसेवक कणके यांनी तात्काळ अग्निशामक दलाचे केदार आवटे यांना या संदर्भात कळवले. त्यांनी रविवार पेठ, सावरकर मैदान, होटगी रोड या परिसरातील अग्निशामक दलाच्या गाड्या तैनात केल्या. तीन गाड्यांनी पाण्याचा मारा केल्याने आग आटोक्यात आली. कोणत्याही प्रकारे जीवितहानी झाली नाही. परंतु घरातील प्रापंचिक साहित्य, संसार उपयोगी, भांडी, धनधान्य जळून खाक झाले.अनेक घरात गॅसच्या टाक्या होत्या. परंतु स्थानिक कार्यकर्ते व अग्निशामक दलाच्या पथकाने गॅस टाक्या बाहेर काढल्याने मोठा अनर्थ टळला. या आगीचे कारण अद्याप स्पष्ट झाले नाही. रस्ता अरुंद असल्याने अग्निशामक दलाच्या गाड्या त्या ठिकाणी पोचण्यास अडथळा निर्माण झाला होता. परंतु आग आटोक्यात आणली. अशी माहिती केदार आवटे यांनी दिली.

## डॉ.वाघमारे, प्रा.जोशी, ॲड.पाटील यांना 'मसाप' अक्कलकोटचे राज्यस्तरीय पुरस्कार

सुराज्य/अक्कलकोट



डॉ. जनार्दन वाघमारे



श्री. मिलिंद जोशी



ॲड. बी. एस. पाटील

येथील महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे, शाखा अक्कलकोटच्या वतीने यंदाच्या वर्षी ज्येष्ठ साहित्यिक आणि माजी कुलगुरू डॉ. जनार्दन वाघमारे, महाराष्ट्रातील चतुरस्त्र वक्ते प्रा. मिलिंद जोशी, आणि ज्येष्ठ शिक्षणतज्ञ व ज्येष्ठ विधीज्ञ ड. बी. एस. पाटील यांना यंदाच्या वर्षी राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर करण्यात आल्याची माहिती मसाप अक्कलकोट शाखेच्या अध्यक्षा सौ. शैलशिल्पा जाधव यांनी दिली.

गुरुवार दिनांक २९ डिसेंबर २०२२ रोजी सकाळी ११ वाजता अक्कलकोट येथील श्री. स्वामी समर्थ देवस्थान ट्रस्टचे स्व. बाळासाहेब इंगळे पॉलिटेक्निक कॉलेजमध्ये भारताचे माजी केंद्रीय गृहमंत्री. सुशीलकुमार शिंदे यांच्या हस्ते आणि महाराष्ट्राचे माजी गृहराज्यमंत्री सिध्दाराम म्हेत्रे यांच्या अध्यक्षतेखाली आणि श्री. स्वामी समर्थ देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष महेश इंगळे, श्री. स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले, महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे, सोलापूर जिल्ह्याचे प्रतिनिधी पद्माकर कुलकर्णी, माजी नगराध्यक्ष अशपाक बळोरगी, कृषी उत्पन्न बाजार समिती दुधनीचे सभापती प्रथमेश म्हेत्रे, कृषी आणि पशुसंवर्धन जिल्हा परिषद सोलापूरचे माजी सभापती मल्लिकार्जुन पाटील, युवा नेत्या शितल म्हेत्रे, आणि स्व. बाळासाहेब इंगळे पॉलिटेक्निक कॉलेजचे प्राचार्य नागनाथ जेऊरे यांच्या प्रमुख उपस्थितीत या राज्यस्तरीय पुरस्काराचे वितरण होणार आहे.

लातूरचे ज्येष्ठ साहित्यिक, माजी खासदार, तथा स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे संस्थापक कुलगुरू डॉ. जनार्दन वाघमारे यांना त्यांनी साहित्य क्षेत्रात आत्तापर्यंत केलेल्या कार्याबद्दल श्रीमंत विजयसिंहराजे भोसले यांच्या स्मरणार्थ, तर महाराष्ट्र साहित्य परिषदेचे पुण्याचे कार्याध्यक्ष आणि चिंतनशील चतुरस्त्र वक्ते प्रा. मिलिंद जोशी यांना साहित्यिक, सांस्कृतिक आणि शैक्षणिक क्षेत्रात केलेल्या विशेष योगदाना बद्दल स्व. बाळासाहेब इंगळे यांच्या स्मरणार्थ, आणि पश्चिम महाराष्ट्रातील शैक्षणिक, सामाजिक, राजकारण आणि साहित्य क्षेत्रात दीर्घकाळ कार्यरत असणारे इस्लामपूरचे ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. बी. एस. पाटील (अण्णा) यांना स्व. मातोश्री लक्ष्मीबाई म्हेत्रे यांच्या स्मरणार्थ राज्यस्तरीय पुरस्कार सन्मानपूर्वक दिले जाणार आहेत. रोख रक्कम, सन्मानपत्र, शाल, श्रीफळ आणि पुस्तक असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

या समारंभाला साहित्य व सांस्कृतिक क्षेत्रातील मान्यवर रसिकांनी उपस्थित रहावे असे आवाहन महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे शाखा अक्कलकोटच्या अध्यक्षा शैलशिल्पा जाधव आणि प्रमुख कार्यवाह दिनकर शिंपी यांनी केले आहे. या प्रसंगी सौ. आरती काळे, अभय खोबरे, दत्तात्रय बाबर, लक्ष्मण पाटील, सौ.पुष्पा हरवाळकर, मुकुंद पत्की, बापुजी निंबाळकर, प्रा. भिमराव साठे, राजु भोसले, सुभाष सुरवसे, प्रभाकर गुरव, राजेश पडवळकर, दयानंद परिचारक आदी उपस्थित होते.

## अट्रॉसिटी प्रकरणी उच्च न्यायालयात अटकपूर्व जामीन

सोलापूर : जागेच्या वादातून मारहाण व जातीवाचक शिवीगाळ केल्याच्या गुन्ह्यातील धनाजी गायकवाड (रा. पोखरापुर,ता.मोहोळ) याच्या अटकपूर्व जामीन अर्जास मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती सारंग कोतवाल यांनी मंजूरी दिली. २८ नोव्हेंबर २०२१ रोजी दुपारच्या च् सुमारास फिर्यादी व तिच्या कुटुंबातील सदस्य हे त्यांच्या घरासमोर बसलेले असताना आरोपी धनाजी गायकवाड याने फिर्यादीस तुम्ही बसलेली जागा माझी आहे, तुम्ही येथून निघुन जावा असे म्हणाला. फिर्यादीने जागा सोडण्यास नकार दिला तेव्हा आरोपी व त्याच्या साथीदाराने मारहाण करून जातीवाचक शिवीगाळ केली.अशा आशयाची फिर्याद मोहोळ पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली होती.जिल्हासत्र न्यायालयाने आरोपी गायकवाड याचा अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळला होता. त्यानंतर आरोपीने ड. जयदीप माने यांच्यामार्फत उच्च न्यायालयात अर्ज दाखल केला होता. या प्रकरणात आरोपीतर्फे ड. जयदीप माने यांनी तर सरकारतर्फे ड. एस.आर.आगरकर यांनी काम पाहिले.

### अज्ञात चोरट्याने दुचाकी पळवली

सोलापूर (प्रतिनिधी) अज्ञात चोरट्याने दुचाकी क्रमांक.एम. एच.१३.बीएस.०२३९ ही एसआर लोणी यांच्या मुरारजी पेठेतील प्लॉटमध्ये पार्क करून ठेवली होती. त्यावेळी ही दुचाकी चोरून नेली आहे. ही घटना दि.२० डिसेंबर रोजी सकाळी दहा ते दुपारी दोन वाजण्याच्या दरम्यान घडली. याप्रकरणी व्यंकटेश जयराम बोम्मा (वय-३५,रा.वारद चाळ, मुरारजी पेठ) यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे घटनेचा पुढील तपास पोह. जगताप हे करीत आहेत.

### मंगळवेढा येथे घर फोडी; ३ लाखाचे दागिने लंपास

सोलापूर-मंगळवेढा येथील मारवाडी गल्लीत राहणाऱ्या सचिन भाऊ चेळेकर यांच्या बंद घराचे कुलूप तोडून चोरट्याने ३ लाखाचे दागिने पळविले.ही चोरी बुधवारी उघडकीस आली. सचिन चेळेकर हे रविवारी घराला कुलूप लावून गावाला गेले होते. दरम्यान चोरट्याने दरवाजाचे कुलूप तोडून घरात प्रवेश केला आणि कपाटातील ७५ ग्रॅम सोन्याचे दागिने घेऊन पसार झाला.बुधवारी हा प्रकार उघडकीस आल्यानंतर मंगळवेढा पोलिसात फिर्याद दाखल केली. पुढील तपास सहाय्यक निरीक्षक वाघमोडे करीत आहेत.

## प्रभाग २२ मध्ये शरद पवारांचा ८२ वा वाढदिवस, ८२ लाखांच्या विविध विकासकामांचा शुभारंभ

सुराज्य/सोलापूर




सोलापूर शहरातील प्रभाग क्रमांक २२ येथील नागरिकांना स्थानिक मूलभूत सुविधा मिळाव्यात यासाठी दूरदृष्टी डोळ्यासमोर ठेवून प्रभागाच्या सर्वांगीण विकासासाठी कायम अग्रेसर असणारे या भागातील नगरसेवक किसन जाधव आणि नागेश गायकवाड हे नेहमी अग्रेसर असतात असे मनोगत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सोलापूर शहराचे निरीक्षक शेखर माने यांनी व्यक्त केले.

माजी केंद्रीय कृषिमंत्री शरदचंद्र पवार यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून प्रभाग क्रमांक २२ येथे माजी किसन जाधव आणि नागेश गायकवाड यांच्या विशेष प्रयत्नातून आणि तत्कालीन पालकमंत्री दत्तात्रय भरणे यांच्या विशेष निधीतून ८२ लाख रुपयाच्या कामाचे शुभारंभ यावेळी करण्यात आला. यावेळी शहराध्यक्ष भारत जाधव, माजी शहराध्यक्ष महेश गादेकर, सुधीर खरटमल, तौफिक शेख, महिला शहराध्यक्ष सुनिता रोटे, कार्याध्यक्ष लता ढेरे, लता फुटाणे, दीपक राजगे यांच्यासह राष्ट्रवादीचे नेते व पदाधिकारी यांच्या उपस्थितीत होते.

खासदार शरद पवार यांच्या ८२ व्या वाढदिवसाचे औचित्य साधून ८२ लाख रुपयांच्या विविध विकास कामांचा शुभारंभ ८२ नारळ यावेळी फोडण्यात आले. यावेळी सुहास कदम, प्रणिता मैंदर्गीकर, शंकर रखमाजी जाधव, जेष्ठ, अंबादास गायकवाड, दिपक जाधव, आल्लाबक्ष सय्यद, समध मिस्त्री, इरफान शेख, बिराजदार माऊशी, गिरीश जाधव, विष्णू गायकवाड ,भारत जाधव, अक्षय जाधव, राजू बेळेनवरु, अमित मोतेवार, सचिन पवार, उद्धव पवार, फिरोज शेख, वसंत कांबळे, माऊली जरग, जितेंद्र दारलू, माणिक कांबळे, ऋषी येवले यांच्यासह प्रभागातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जि.प.शाळांच्या वर्ग खोल्या बनल्या धोकादायक

सांगोला : सांगोला तालुक्यातील जिल्हा परिषद अनेक शाळांच्या वर्ग खोल्या धोकादायक बनले आहेत. यामध्ये जिल्हा परिषद शाळा क्रमांक एक व दोन शेजारील जुन्या इमारतीचा स्लॅब व कॉलम अर्थात पोल चा काही भाग कोसळण्याच्या मार्गावर असल्याने, एखादी दुर्घटना घडल्यास त्याला जबाबदार कोण? असा प्रश्न उपस्थित होत आहे. पावसाळ्या नंतर तरी शाळांच्या खोल्या दुरुस्त होतील का?, असा प्रश्न उपस्थित होत असताना मात्र, जिल्हा शिक्षण विभागाच्या डोळेझाकपणामुळे विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.



सांगोला तालुक्यात धोकादायक खोल्या असलेल्या शाळांमधील अनेक खोल्यांना तडे जाणे, छत गळणे, छातातून पावसाचे पाणी येणे यासारखी स्थिती आहे. या परिस्थितीमुळे शाळेतील विद्यार्थी जीव मुठीत घेऊन शिक्षण घेत आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न समोर आला आहे. दरम्यान, जिल्हा परिषदांच्या शाळांमध्ये डिजिटल शिक्षण पध्दती सुरू केली असताना, विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी सुसज्ज खोल्या असणे आवश्यक आहे. मात्र, झेडपीच्या काही शाळांमध्ये धोकादायक स्थितीत शिक्षण सुरू आहे. अशी परिस्थिती असताना, सांगोला शहरातील इयत्ता पहिली ते चौथीपर्यंत जिल्हा परिषद तसेच त्याच ठिकाणी उर्दू शाळा यासह अंगणवाडी शाळा भरत आहे. अशा जिल्हा परिषद शाळा क्रमांक १ व २ या शाळा परिसरातील जुनी इमारत जीर्ण झाली आहे. त्यामुळे दररोज या इमारतीचा काही भाग कोसळत आहे. आणि याच इमारतीखाली जिल्हा परिषद शाळा एक व दोन मधील विद्यार्थी ये-जा करीत आहेत. याबाबत शिक्षकांनी शाळांच्या स्थितीबाबत शिक्षण विभागाला माहितीही दिली आहे. परंतु, शिक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांनी त्याकडे दुर्लक्ष केल्याचे दिसून येते. वरिष्ठांकडून त्याला मंजुरी मिळत नाही. इमारतीची अवस्था दिवसेंदिवस अधिकच वाईट होत आहे. शाळेच्या इमारतीचे बांधकाम कालबाह्य झाल्याने दुरवस्था झाली आहे. शिक्षण क्षेत्रात देखील मोठ मोठ्या स्पर्धा निर्माण झाल्याने जिल्हा परिषद शाळांमध्ये देखील त्याच पद्धतीने तोडीस तोड शिक्षण पद्धती उपलब्ध करून दिले आहेत.

डिजिटल आणि अत्याधुनिक युगात विद्यार्थी सर्वांगीण बाजूने घडले पाहिजे याकरिता जिल्हा परिषदेचे शिक्षक प्रयत्नशील असून, तालुक्यात लोकसहभाग च्या माध्यमातून बहुतांश शाळा डिजिटल आणि आयएसओ मानांकन प्राप्त झाले आहेत. एकीकडे अशी परिस्थिती असली तरी दुसरीकडे मात्र तालुक्यातील धोकादायक शाळांची परिस्थिती देखील विद्यार्थ्यांना धोक्याची घंटा देताना दिसून येत आहे. यासंदर्भात सोलापूर जिल्हा परिषद शिक्षण विभागाकडून व सांगोला तालुका शिक्षण विभागाकडून तात्काळ उपाययोजना करून ना दुरुस्त आणी धोकादायक शाळा दुरुस्ती करून घ्याव्यात अशी मागणी पालक वर्गातून जोर धरू लागली आहे.











## वाळूज येथे कुटुंबांना चादर वाटप

**चिखली :** मोहोळ तालुक्यातील वाळूज येथे गावातील सर्व कुटुंबांना चादर वाटप करण्यात आले. हा उपक्रम प्रख्यात स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ.संदेश कादे आणि डॉ. प्रियदर्शनी कादे यांची कन्या दिया संदेश कादे यांच्या सन्मानार्थ गावातील जवळपास ६०० कुटुंबीयांना चादरींचे वाटप करण्यात आले. यावेळी मोहोळचे नायब तहसीलदार लिना खरात, राष्ट्रवादी महिला सचिव ज्योत्स्ना पाटील यांच्या हस्ते गावातील कुटुंबीयांना चादर वाटप करण्यात आले. यावेळी नायब तहसीलदार लिना खरात, राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या जिल्हा सचिव ज्योत्स्ना पाटील, जगन्नाथ कोल्हाळ, सोपान काकडे, डॉ प्रियदर्शनी कादे, माजी सरपंच अमोल कादे, सुदर्शन कादे, लहु कादे, जनार्धन परीट, मोहोन मोटे, पांडुरंग मोटे, उत्कर्ष मोटे, नंदकुमार घाडगे, मधुकर घाडगे यांच्यासह गावातील बहुसंख्य नागरिक उपस्थित होते.



## शरद बँकेच्या दिनदर्शिकेचे १०१ जणांच्या हस्ते प्रकाशन

**सोलापूर :** येथील शरद नागरी सहकारी बँकेच्या २०२३ या नव्या वर्षातील दिनदर्शिकेचे प्रकाशन १०१ ज्येष्ठ नागरीक आणि मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. दमाणी नगर येथे हा प्रकाशन सोहळा बँकेचे संस्थापक तथा माजी महापौर मनोहर सपाटे यांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे शहराध्यक्ष भारत जाधव, प्रदेश सचिव संतोष पवार, प्रदेश युवक उपाध्यक्ष प्रशांत बाबर, शहर सचिव प्रमोद भोसले तसेच लहु गायकवाड, उमाकांत निकम, महंमद शेख, औदुंबर जगताप, बजरंग जाधव, चंद्रकांत पवार, महादेव गवळी, दत्ता भोसले आदींच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. प्रारंभी स्वागत बँकेचे अध्यक्ष प्रा.महेश माने यांनी केले तर प्रास्ताविक बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राजेंद्र आवताडे यांनी केले. यावेळी सुजाता जुगदार, विणा मोरे, अंजली कुदळे, रेवती सातपुते, आशा सुरवसे, रेष्मा शेख, कविता लड्डा, योगीता हावळे, क्रांती खलाणे, बिसमिल्ला तांबोळी आदी मान्यवर उपस्थीत होते. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन सोमनाथ बचुटे यांनी केले तर आभार सुनील क्षीरसागर यांनी मानले.

# मंद्रुप, कुंभारी औद्योगिक क्षेत्राची भूनिवड समितीकडून पाहणी

**▸ वादग्रस्त जमीन वगळून वाढीव जमीन घेण्याची हमी**

सुराज्य/दक्षिण सोलापूर

**दक्षिण सोलापूर तालुक्यातील मंद्रुप आणि कुंभारी येथील औद्योगिक विकास महामंडळाच्या जागेची पाहणी भूनिवड समितीच्या वरिष्ठ पथकाने केली.उपोषणकर्त्या मंद्रुपच्या शेतकऱ्यांची भेट घेऊन सुपीक जमीन वगळण्याची शिफारस शासनाकडे करण्याची हमी दिली. आणि वाढीव क्षेत्र समाविष्ट करून लवकरच औद्योगिक क्षेत्र विकसित करण्याचा विश्वास व्यक्त केला.**





औद्योगिक विकास महामंडळाचे भूनिवड समितीप्रमुख तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी एस.ए. रंगनाईक, उपमुख्य कार्यकारी अधिकारी शिवाजी पाटील, अधिक्षक अभियंता, राजेंद्र गावडे मुख्य नियोजक संजय पाटील, कार्यकारी अभियंता सुधाकर गांधिले, प्रादेशिक अधिकारी वसुंधरा बिरजे, क्षेत्र व्यवस्थापक गणपत कोळेकर, उपअभियंता अशोक मगर, भूमापक पठाण, मंद्रुपचे तहसिलदार राजशेखर लिंबारे, राष्ट्रवादीचे जिल्हा खजिनदार डॉ.बसवराज बगले, शिवा संघटनेचे जिल्हाध्यक्ष राजकुमार सारणे, माजी सभापती आप्पाराव कोरे, राष्ट्रवादीचे नेते शिवानंद हिरेमठ,शिवसेनेचे नेते रमेश नवले,डॉ.शिवानंद झळके, प्रविण कुंभार, मंद्रुपचे तलाठी निंगप्पा कोळी आदिसह शेकडो शेतकरी यावेळी उपस्थित होते.

दरम्यान या भूनिवड समितीच्या पथकाने दुपारी कुंभारी येथील प्रस्तावित क्षेत्राची सुध्दा पाहणी केली.डिसेंबर २०१३ साली मंद्रुप एम.आय.डी.सीचा प्रस्ताव मंजूर करून आणलेल्या डॉ.बसवराज बगले यांनी सर्व कागदपत्रांसह नकाशे सादर करून वस्तुनिष्ठ परिस्थिती या पथकाला सांगितली.नियोजित मंद्रुप,कुंभारी औद्योगिक क्षेत्रास आणि चिंचोली व सोलापूर एम.आय.डी.सीसाठी उजनीतून थेट पाईपलाईनद्वारे पाणी आणण्याचा प्रस्तावही डॉ.बसवराज बगले यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांसमोर माडला.त्याबाबत सकारात्मक प्रतिसाद देऊन अंधेरी येथील मुख्यालयात चर्चेसाठी डॉ.बसवराज बगले यांना येण्यास सांगितले. ७५ व्या उच्चाधिकार समितीने मंजुरी दिलेल्या अडीच हजार हेक्टर क्षेत्रातील मंद्रुप माळकवठे,निंबर्गी आणि कंदलगाव परिसरातील जास्तीत जास्त जमीन मंद्रुप औद्योगिक क्षेत्रासाठी संपादित करण्याबाबत सखोल चर्चा झाली. २०१३ मधील मंजुरीनुसार जमीनीची निवड व संपादन करण्यासंबंधीचा सुधारीत अहवाल शासनाला देण्याची हमी यावेळी भूनिवड समितीच्या प्रमुखांनी दिली.

# आचेगाव ग्रा.पं.वर बाळासाहेबांची शिवसेना शिंदे गटाचे निर्विवाद वर्चस्व

### श्री शावरसिद्ध ग्रामविकास पॅनलचे विश्रांती पाटील यांची थेट जनतेतून सरपंचपदी निवड

**अक्लकोट :** दक्षिण सोलापूर तालुक्यातील आचेगाव ग्रामपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणुकीत शावरसिद्ध ग्रामविकास पॅनलने विरोधकांना चारी मुंडी चित करत विजयी झाले आहे. श्री शावरसिद्ध ग्रामविकास पॅनल कडून थेट जनतेतून सरपंच पदासाठी निवडून आलेल्या विश्रांती शावरसिध्द पाटील यांच्या सह श्री शावरसिद्ध ग्रामविकास पॅनलचे ११ पैकी ६ सदस्य जागेवर दमदार यश मिळाले आहे.



विरोधक स्वाभिमान ग्रामविकास पॅनलचे फक्त ५ सदस्य जागेवर समाधान मानावे लागले.आचेगाव ग्रा.पं.वर बाळासाहेबांची शिवसेना (शिंदे गट ) गटाचे निर्विवाद वर्चस्व मिळविले आहे. श्री शावरसिद्ध ग्रामविकास पॅनलचे थेट जनतेतून सरपंच विश्रांती पाटील यांचा विजयी झाले.

आचेगाव ग्रामपंचायत निवडणुकीत अतिशय अटीतटीच्या लढतीत सत्ताधारी पॅनेलचे दारुण पराभव करून विजयाची माळ खेचून घेण्यात यश मिळाले आहे.तत्कालीन सरपंच रमेश क्षिरसागर हे आचेगावच्या ग्रामपंचायत निवडणुकीत काँग्रेसचे गोटात गेल्यामुळे जनतेत असंतोषाचे भावना निर्माण झाली आहे.व तत्कालीन सरपंच रमेश क्षिरसागर यांच्या माध्यमातून आचेगाव साठी जनहितार्थ कुठलेही कामे झालेली नाही, असे ग्रामस्थांमधून बोलले जात असून, त्या नाराजीचा फटका या ग्रामपंचायतीच्या निवडणुकीच्या निकालावरुन झालेची स्पष्टपणे दिसून येते. आचेगावात सरपंच पदासाठी ओबीसी महिला राखीव जागेत सरपंच पद विश्रांती शावरसिध्द पाटील यांना (१३५४),मते मिळाली आहे. त्यांच्या पॅनेलचे सदस्य : नागप्पा कांबळे(४९६), मलकारी कोरे (४४२), रफिक मुल्ला (३९०), रेश्मा पाटील (४३२), या सदस्यांनी निवडणुकीत यश संपादन केले व शांताबाई शिलेणी व जयश्री खांडेकर हे दोघे अगोदरच बिनविरोध निवडून आले होते.

# चोरीस गेलेली रिक्षा जोडभावी पेठ पोलिसांनी केली जप्त

**सोलापूर :** जोडभावी पेठ पोलीस ठाण्याच्या गुन्हे प्रकटीकरण पथकाने चोरीस गेलेली रिक्षा पकडली असून याप्रकरणी एका विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.जोडभावी पेठ पोलीस ठाण्याच्या गुन्हे प्रकटीकरण पथकाने उल्लेखनीय कामगिरी बजावली आहे.चोरीस गेलेल्या रिक्षाचा मोठ्या शितापीने तपास लावून शहबाज गुलाब फुलारी (वय-१८,रा.सोलापुर) याला ताब्यात घेऊन त्याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. फिर्यादी सचिन सिद्धेश्वर गायकवाड (वय-३२,रा.जुना बोरामणी नाका) यांची रिक्षा क्र.एम.एच.१३.सीटी.४४३६ ही चोरीला गेल्याप्रकरणी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात फिर्याद नोंदवली होती.

# विकासासाठी पाठीशी राहील : आ.माने

सुराज्य/उत्तर सोलापूर

डोणगांवच्या जागरूक मतदारांनी आपणास मोठया विश्वासाने व अपेक्षेने गावच्या विकासासाठी निवडून दिले आहे. सत्ता दिली असून त्यांच्या विश्वासास पात्र राहून काम करा. विकास कामात काही अडचणी आल्या, मी सदैव तुमच्या पाठीशी आहे. असे माजी आमदार दिलीपराव माने यांनी सांगितले.

डोणगांव ता. उत्तर सोलापूर येथील नूतन ग्रामपंचायत सदस्यांचा सत्कार समारंभात ते बोलत होते. यावेळी रामभाऊ हाक्के, नंदकुमार पाटील, दिंगबर मेटे, हभप पंकज गुंड, राजाराम कोलते. प्रशांत चराटे, मेटे सर, विजय अवताडे, रमाकांत चराटे, रमेश पाटील, नेताजी गायकवाड, बिरू गायकवाड, सुमित शिंदे यांची प्रमुख उपस्थित होते. भाजपाची असलेली सत्ता, मनमानी कारभार, विकास कामाकडे दुर्लक्ष, यामुळे मतदारांनी आपणास एकतर्फीच सत्ता दिली आहे. सरपंच व दोन सदस्य़ थोडया मतांनी पराभूत झाले आहेत.

गावात चांगली विकास कामे करा. जनतेचे प्रश्न. सोडवा, गरजूंना शासनाच्या योजना मिळवून दया. विकास कामासाठी कोणत्याही विभागात प्रशासकीय अडचणी आल्या तर मी आपल्या सदैव पाठीशी असल्याचे माने यांनी सांगितले. यावेळी नतून सदस्य़ नाना कर्दळकर, रमेश पाटील, गौरी आवताडे, पंडीत हेगडे, अश्विनी सुरवसे, धनंजय गायकवाड, मनिषा अवताडे, आरती गायकवाड, यांचा सत्कार माने यांच्या हस्ते करण्यात आला यावेळी यांनी नवनिर्वाचीत सदस्यांना शुभेच्छा दिल्या.

**रानमसले येथील नूतन सरपंच मनोहर क्षिरसागर यांचे सत्कार माजी आमदार दिलीपराव माने यांनी करून शुभेच्छा दिल्या. यावेळी दूध संघाचे संचालक मनोज गरड, चेअरमन मुकुंद गरड, निलेश गरड, गोपाळ करंडे उपस्थित होते.**


MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**SRM E-TENDER NOTICE**

| Sr. No. | RFx No. | Name of Work | Tender No. | Estimated Cost & EMD (in Rs.) | Tender Fee (in Rs.) | Work Completion Period | Date of Tender Submission | Date of Technical Bid Opening |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 7000025556 | Construction of WBM and providing 20mm premix carpet at 132 kV Substation **Manegaon** Tal. Sangola Dist. Solapur. | T-21/ 2022-23 | Rs. 20,72,093/- <br> Rs. 20,720.93 | 500 + GST | 02 Months | 23.12.2022 (11:00 Hrs) up to 30.12.2022 (11:00 Hrs) | 30.12.2022 (12:00 Hrs) (If possible) |
| 2 | 7000025557 | Construction of R.C.C. sump well & miscellaneous civil works at **132 kV Nimboni Substation,** Tal. Mangalwedha, Dist. Solapur. | T-22/ 2022-23 | Rs. 15,67,817/- <br> Rs. 15,678.17 | 500 + GST | 04 Months | 23.12.2022 (11:00 Hrs) up to 30.12.2022 (11:00 Hrs) | 30.12.2022 (12:00 Hrs) (If possible) |
| 3 | 7000025558 | Providing & laying bituminous approach road from main gate of S/s to switchyard and Main gate to approach road at **132 kV S/Stn. Karmala,** Dist. Solapur. | T-23/ 2022-23 | Rs. 19,39,194/- <br> Rs. 19,391.94 | 500 + GST | 04 Months | 23.12.2022 (11:00 Hrs) up to 30.12.2022 (11:00 Hrs) | 30.12.2022 (12:00 Hrs) (If possible) |
| 4 | 7000025559 | Construction of RCC road at 132/33 kV Substation **Puluj** Tal. Pandharpur Dist. Solapur | T-24/ 2022-23 | Rs. 24,84,813/- <br> Rs. 24,848.13 | 500 + GST | 04 Months | 23.12.2022 (11:00 Hrs) up to 30.12.2022 (11:00 Hrs) | 30.12.2022 (12:00 Hrs) (If possible) |

For further details, visit out website **https://srmetender.mahatransco.in/**

**Note:** All eligible interested contractors are mandated to get enrolled on SRM E-Tendering portal (**https://srmetender.mahatransco.in**).

**Sd/-**
**Executive Engineer (Civil)**
**EHV, CCCM Division, Solapur**



रासनिप्रा

**तालुका सहकारी निवडणूक अधिकारी तथा**
**सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, अकलूज तालुका माळशिरस**
**कृषी उत्पन्न बाजार समिती, अकलूजचे आवार, ता.माळशिरस, जि.सोलापूर**

जा.क्र.सनिअ/निवडणूक/क वर्ग/सन२०२२/ दि.२३/१२/२०२२

**जाहीर प्रसिध्दीकरण**

महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणूक) नियम २०१४ मधील तरतूदी नुसार तालुका सहकारी निवडणूक अधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, अकलुज, ता.माळशिरस, जि.सोलापूर या व्दारे क वर्गातील खालील नमूद सहकारी संस्थेची प्रारूप मतदार यादी, हरकती व आक्षेप मागविण्यासाठी या कार्यालयात, संबंधीत संस्थेत, तसेच संबंधित ग्रामपंचायत कार्यालयात प्रसिध्द करणेत आलेली असून संबंधीत संस्थेच्या खालील नमूद तारखांनुसार प्रारूप मतदार यादीवर आक्षेप व हरकती लेखी स्वरूपात सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, अकलुज, ता. माळशिरस, या कार्यालयाकडे विहित मुदतीत कार्यालयीन वेळेत दाखल करावेत.

| अ.क्र. | संस्थेचे नाव | अ.क्र. | संस्थेचे नाव |
|---|---|---|---|
| १. | रेणुका महिला ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या. नातेपुते | ६. | नातेपुते एज्युकेशन सोसा. शिक्षक व सेवक सहकारी पतसंस्था मर्या नातेपुते |
| २. | माळशिरस तालुका प्राथमिक शिक्षक सहकारी पतसंस्था मर्या अकलुज | ७. | शुगरकेन प्रोड्युसर्स वि. कार्य. सह. सोसायटी लि. सेवकांची पतसंस्था मर्या माळीनगर |
| ३. | सावित्राबाई फुले महिला ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या वेळापूर | ८. | रणधैर्य ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या. महाळुंग |
| ४. | जय विजय प्राथमिक शिक्षक सहकारी पतसंस्था मर्या अकलुज | ९. | रेणुका ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या नातेपुते |
| ५. | सार्वजनिक बांधकाम विभागीय सेवकांची सहकारी पतसंस्था मर्या अकलुज | १०. | चंद्रशेखर आगासे ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या श्रीपूर |

**मतदार यादी प्रसिध्दीचा कार्यक्रम**

१) प्रारूप मतदार यादी प्रसिध्द : दि.२३/१२/२०२२.
२) प्रारूप मतदार यादीवरील हरकती व आक्षेप मागविणे : दि. २३/१२/२०२२ ते २९/१२/२०२२
३) प्रारूप मतदार यादीवरील आक्षेप व हरकतींवर निर्णय : दि. ०२/०१/२०२३.
४) अंतिम मतदार यादी जाहीर : दि. ०३/०१/२०२३.

टिप :१) प्रारूप मतदार यादींवरील हरकती व आक्षेप घेणेच्या अंतिम दिनांकानंतर आलेल्या हरकती व आक्षेपांचा विचार केला जाणार नाही.
२) महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणूक) नियम २०१४ मधील नियम ८ अन्वये प्रारूप मतदार यादीवरील हरकती व आक्षेपांचा निर्णय करून अंतिम मतदार यादी तयार करण्यात येईल.
३) अंतिम मतदार यादी संस्था कार्यालय व या कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर प्रसिद्ध करण्यात येईल.

शिक्का

(एम. एल. शिंदे)
तालुका सहकारी निवडणूक अधिकारी तथा
सहाय्यक निबंधक,सहकारी संस्था,
अकलुज,ता.माळशिरस जि. सोलापूर.



MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**SRM E-TENDER NOTICE**

Digitally signed online bids are invited through E-Tender process of MSETCL in two-bid system from bidders who are registered Contractors of MSETCL. **RFx No.7000025550 E-Tender No.** SE/EHV/O&M/Circle/SHP/E-Tender:18/2022-2023 **Particulars:** Work of Supply of General Asset & Furniture for newly constructed rest house at 400 kV R.S Division Lamboti. **Estimated Cost:** Rs. 4,04,603/- **EMD (Approx. 1% of Est. Cost):** Rs. 5,000/- **Tender Cost:** Rs. 500/- + GST **Sale Period:** 21.12.2022 to 28.12.2022 **Last Date of Submission:** 28.12.2022 up to 18:00 Hrs **Date of Opening (Tech. Bid):** 28.12.2022 at 18:30 Hrs (If possible). **Contact Person:** Superintending Engineer, 8888890008.
For further details, please visit to **https://srmetender.mahatransco.in**
**Note:** All eligible Suppliers/Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**Sd/-**
**Superintending Engineer**
**EHV (O&M) Circle, Solapur**



महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

**ई–निविदा सुचना क्र. १०/२०२२–२३**

महावितरण तसेच शासन ई–नोंदणीकृत व अनुभवी स्थापत्य कंत्राटदाराकडुन कार्यकारी अभियंता (स्था), स्थापत्य विभाग महावितरण, बारामती अंतर्गत सोलापूर सं व सु मंडल कार्यक्षेत्रातील विविध कामे करण्यासाठी खालील प्रमाणे ई–निविदा मागविण्यात येत आहेत.

| निविदा क्र. | कामाचे स्वरूप | निविदा रक्कम रू. |
|---|---|---|
| टि–४०/ २०२२–२३ (2nd Call) | सं व सु उपविभाग सोलापूर ग्रामिण व सोलापूर शहर, जुनी मिल कंपाऊंड परिसर जि.सोलापूर च्या इमारतीची विविध स्थापत्य दुरूस्ती कामे करणे. | रू.९.८८ लाख |
| | **एकूण निविदा रक्कम** | **रू.९.८८ लाख** |

ई– निविदा विक्रीचा कालावधी दि. २३ डिसेंबर २०२२ ते दि. २९ डिसेंबर २०२२ असून ई–निविदा सादर करण्याची अंतिम तारीख दि. २९ डिसेंबर २०२२ रोजी दुपारी १ वाजेपर्यंत आहे. ई–निविदा, बयाणा रक्कम ऑनलाईन भरून सर्व तपशिलासह व विहीत नमुन्यात सादर करावी. सविस्तर निविदा महावितरणच्या https://etender.mahadiscom.in/eatApp या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

संपर्क : अतिरिक्त कार्यकारी अभियंता (स्था), बारामती. मो.७८७५७६८९०५. निविदेची मुदतवाढ झाल्यास वर्तमानपत्रात जाहिरात दिली जाणार नाही. संबंधितानी वेबसाईटला भेट देऊन लक्ष दयावे.

**कार्यकारी अभियंता (स्था),**
**स्थापत्य विभाग, बारामती**

PRO/BMTZ/148/2022-23



**जाहीर समन्स**

**मा.उपनिबंधक, सहकारी संस्था, (परसेवा)**
सोलापूर जिल्हा नागरी सहकारी बँक्स् को-ऑप.असोसिएशन लि., सोलापूर
११३ (अ), सिध्देश्वर पेठ, स्टेट बँक ऑफ इंडिया ट्रेझरी शाखेशेजारी, सोलापूर - ०१

**रतनचंद शहा सह. बँक लि. मंगळवेढा** **... अर्जदार**
**विरुद्ध**
(खालील तपशिलातील नमुद केलेले थकबाकीदार सभासद) **... जाब देणार**

| अ. नं. | केस नं. | दावा रक्कम | जाब देणार नं. | जाब देणार यांचे नाव व पत्ता |
|---|---|---|---|---|
| १ | ६१०/२०२२-२३ | २,५९,१४९/- | ३ | श्री. गणेश बाळासो जाधव, रा. दत्तुगल्ली, मंगळवेढा, ता. मंगळवेढा, जि. सोलापूर |
| २ | ६१२/२०२२-२३ | ६३,६०१/- | २ | श्री. परमेश्वर गोरख गायकवाड, रा.ढवळस, ता. मंगळवेढा, जि. सोलापूर |
| ३ | ६१३/२०२२-२३ | ६३,६०१/- | १ | श्री. संतोष धर्मराज चव्हाण, रा. शनिवार पेठ, मंगळवेढा, ता. मंगळवेढा, जि. सोलापूर |
| ४ | ६१४/२०२२-२३ | ५३,२३७/- | ३ | श्री. उत्तम दरिबा ढगे, रा. बक्षीवाडा, किल्ला भाग, मंगळवेढा, ता. मंगळवेढा, जि. सोलापूर |
| ५ | ६१५/२०२२-२३ | १,१५,३४१/- | ३ | श्री. उत्तम दरिबा ढगे, रा. किल्ला भाग, मंगळवेढा, ता. मंगळवेढा, जि. सोलापूर |
| ६ | ६१७/२०२२-२३ | ६९,५५९/- | १ <br> २ <br> ३ | श्री. मिलिंद सुखदेव शेंबडे, रा. भिमनगर, मंगळवेढा, ता. मंगळवेढा, जि. सोलापूर <br> श्री. गणेश विष्णु नवले, रा.जगदाळेगल्ली, मंगळवेढा, ता. मंगळवेढा, जि. सोलापूर <br> इंदुबाई सुखदेव शेंबडे, रा. भिमनगर, मंगळवेढा, ता. मंगळवेढा, जि. सोलापूर |
| ७ | ६२०/२०२२-२३ | १,१४,९५३/- | २ | सुहास म्हताप्पा दहिटणेकर, रा. सी. ६९/७०, श्रीकांत नगर, जुळे सोलापूर, विजापूर रोड, सोलापूर |
| ८ | ६२२/२०२२-२३ | ९०,४५०/- | ३ | दत्तात्रय गोपाळ मस्के, रा. ६५ब, प्रल्हाद नगर, विजापूर रोड, सोलापूर |
| ९ | ६२३/२०२२-२३ | ७६,९८२/- | १ | अमन लकण्णा कोळी, रा. २००, आदित्य नगर, विजापूर रोड, सोलापूर |
| १० | ६२४/२०२२-२३ | ८६,९४३/- | २ | अमन लकण्णा कोळी, रा. २०५, आदित्य नगर, विजापूर रोड, सोलापूर |
| ११ | ६२५/२०२२-२३ | २६,१८३/- | १ <br> ४ | रेहमान शब्बीर पठाण, रा. ५५, सिध्देश्वर पेठ, सोलापूर <br> अमन लकण्णा कोळी, रा. बी २०, आदित्य नगर, विजापूर रोड, सोलापूर |
| १२ | ६२७/२०२२-२३ | ८३,१७४/- | ३ | माधुरी मल्लिनाथ नडगेरी, रा. ५७, राम नारायण, चंडक विहार, जुळे सोलापूर, विजापूर रोड, सोलापूर |

या कामी अर्जदार बँक यांनी दाखल केलेल्या अर्जातील वर नमुद केलेल्या जाब देणार यांनी दिलेला पत्ता उपलब्ध होत नसल्याने सदर जाहीर समन्स देत आहोत.

***उपनिर्दीष्ठ अर्जासंबंधी आपले म्हणणे मांडण्यासाठी स्वत: जातीने वार शुक्रवार दि.१३/०१/२०२३ रोजी दुपारी १२.०० वाजता कागदपत्रासह या कार्यालयात हजर रहावे.***

या नोटीसीद्वारे जाब देणार यांना असेही कळविण्यात येते की, वरील तारखेस वेळेवर हजर न राहिल्यास आपल्या गैरहजेरीत अर्जाची सुनावणी घेण्यात येईल व निर्णय देण्यात येईल. त्याचप्रमाणे वरील तारखेस अगर तत्पुर्वी आपला संपुर्ण पत्ता कळविण्यास कसुर केल्यास आपला बचाव रद्द समजण्यात येईल.

***आज दि.२२/१२/२०२२ रोजी माझी सही व कार्यालयाचे मुद्रेसह हे जाहीर समन्स दिले आहे.***

शिक्का

सही/-
उपनिबंधक
सहकारी संस्था (परसेवा)
सोलापूर जिल्हा नागरी सहकारी
बँक्स् को.ऑप.असोसिएशन लि. सोलापूर

# खुपसंगीत संकरित गायींवर होणार देशी गायीचे भ्रूण प्रत्यारोपण

## महात्मा फुले कृषी विद्यापीठाचा प्रायोगिक प्रकल्प

सुराज्य/सोलापूर

**मंगळवेढा तालुक्यातील खुपसंगी येथे महात्मा फुले कृषी विद्यापीठाच्या देशी गाय संशोधन व प्रशिक्षण केंद्राद्वारे संकरित गायींवर देशी गाईचे भ्रूण प्रत्यारोपण (एम्बरिओ ट्रान्स प्लांट) करून शेतकऱ्यांच्या गोठ्यात उच्च वंशावळीच्या देशी गायी तयार करण्याचा प्रायोगिक प्रकल्प राबविण्याच्या कामाचा प्रारंभ करण्यात आला आहे.**

शेतकऱ्यांनी दुधातून अधिकाधिक पैसे मिळविण्यासाठी संकरित गायींची संख्या वाढविली, परिणामी संकरित गायींच्या दुधाचा महापूर आला आहे. देशी गायींचे दूध दुर्मीळ झाले असून आणखी काही वर्षांत संकरित गायींचेच दूध प्यावे लागण्याची चिन्हे आहेत. पशुसंवर्धन विभाग प्रत्येक पाच वर्षांनी पशुगणना करतो, त्यातून देशी गायींची संख्या लक्षणीय खालावल्याचे स्पष्ट झाले आहे. २०१९ च्या पशुगणनेनुसार मोठी घट झाली. देशी गायी नाममात्र उरल्या आहेत. अधिक दुधासाठी शेतकऱ्यांचा कल संकरित गाई पाळण्याकडे आहे. जिल्ह्यात अनेक शेतकऱ्यांकडे ७० ते २५० संकरित गायींचे गोठे आहेत. परंतु आता महात्मा फुले कृषी विद्यापीठाच्या देशी गाय संशोधन व प्रशिक्षण केंद्राच्या मदतीने संकरित गायींवर देशी गीर किंवा सहिवाल जातींचे भ्रूण प्रत्यारोपण करून जातिवंत देशी गायी वाढविण्यात येणार आहेत.

या प्रकल्पाचे तज्ञ डॉ. सीताराम गोटे यांनी सांगितले की, कृषीभूषण अंकुश पडवळे यांच्या प्रयत्नातून हा प्रकल्प फुले कृषी विद्यापीठाच्यावतीने राबविण्यात येत आहे. तीन वेळा सर्व गायींची तपासणी व माजावर येण्याची प्रक्रिया करूनच संकरित गायींवर देशी गीर किंवा सहिवाल जातीचे भ्रूण प्रत्यारोपण करून जातिवंत देशी गायी वाढविण्यात येणार आहे. प्रकल्पाची सुरुवात दूध संस्थेचे चेअरमन यशवंत सलगर यांच्या गोठ्यातून करण्यात आली.

देशी गाय संशोधन व प्रशिक्षण केंद्राचे प्रमुख डॉ. सोमनाथ माने म्हणाले, 'बदलत्या वातावरणामध्ये तग धरून राहण्याची क्षमता असलेल्या व दुधासाठी प्रसिद्ध असलेल्या देशी गायींची संख्या देशांमध्ये झपाट्याने कमी होत आहे व भ्रूण प्रत्यारोपण तंत्रज्ञानाद्वारे ही संख्या आपण वाढवणे गरजेचे आहे. यासाठी डॉ. सुनील मासाळकर (सहयोगी अधिष्ठाता, कृषी महाविद्यालय, पुणे), डॉ. धीरज कंखरे (तांत्रिक प्रमुख, देशी गाय संशोधन प्रशिक्षण केंद्र), डॉ. विष्णू नरवडे, डॉ. प्रदीप साखरे यांच्या सहकार्याने कार्यक्रम राबविण्यात येत आहे.



यावेळी माजी सरपंच श्रीपती चौगुले, समाधान बंडगर, मनगा चौगुले, दादा शेजाळ, ईश्वर चौगुले, दत्ता कुकडे, रोहित चौगुले, गणेश राजगे आदींसह खुपसंगी गावातील पशुपालक उपस्थित होते.

सध्या भारतात गेली काही दशके विदेशी वळूचे वीर्य वापरून गोसंकर केला जात आहे. अशा संकरामुळेच भारतात क्षयप्रवण पशूंच्या संख्येत वाढ झाली आहे. याबाबत आता नव्याने पाऊले उचलण्याची गरज आहे. देशी गायींच्या वंशाचे संवर्धन हे गरजेचे आहे. देशी गोवंश असणारे खिल्लार, डांगी, लाल कंधारी चोवीस तासात चार लीटर दूध देते. तर गवळाऊ आणि देवणी या गायी सहा लीटर दूध देतात. हे दूध पवित्र तर आहेच शिवाय शुध्दही आहे. तसेच संपूर्ण घराचे आरोग्य राखणारे आहे. देशी गायींचे गोमूत्र परिसर स्वच्छ ठेवते. यामुळे घराचे आरोग्य उत्तम राहते. यासाठीच देशी गायींचे संवर्धन होणे हे गरजेचे आहे.

देशी गायींचे दूध रोगप्रतिकारक असल्याचा प्रचार होत असल्यामुळे या गायींच्या दुधाला मागणी वाढत आहे. प्रत्यक्षात उत्पादन आणि मागणी यात मोठी तफावत आहे. या दुधाला प्रतिलीटर ५० ते ९० रुपयांपर्यंत भाव मिळत आहे. संकरित गायींच्या तुलनेत देशी गायींचे दूध आरोग्याला अधिक पोषक असल्याचा प्रसार सध्या मोठ्या प्रमाणात सुरू आहे.

दूध उत्पादनाबरोबरच गोमूत्र, शेणखत आदींचे शेती आणि आयुर्वेदिक औषधातील महत्त्व पटवून दिले जात आहे.

### देशी गोवंश वाढवणे गरजेचे

देशी गोवंश वाढविण्याची अत्यंत गरज आहे. महात्मा फुले कृषी विद्यापीठाच्यावतीने खुपसंगी येथे प्रायोगिक तत्त्वावर हा प्रकल्प राबविण्यात येत आहे. सध्या देशी गायी दुर्मीळ झाल्यामुळे या प्रकल्पाला विशेष महत्त्व येणार आहे. पुढील पिढ्यांना चांगले देशी गायींचे दूध मिळण्यासाठी सदर प्रकल्पाचा मोठा फायदा होणार आहे. फुले कृषी विद्यापीठाच्या कुलगुरूंमुळे प्रकल्प मंगळवेढा तालुक्यातील खुपसंगी गावाला मिळाला आहे. महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरीचे कुलगुरू डॉ. प्रशांत कुमार पाटील यांच्या संकल्पनेतून हे कार्य शेतकऱ्यांच्या गोठ्यामध्ये राबवले जात आहे.

**- कृषीभूषण अंकुश पडवळे, अध्यक्ष मोर्फा.**

### देशी व विदेशी गायींच्या दुधातील फरक

विदेशात झालेल्या संशोधनानुसार देशी गायींचे दूध हे सुरक्षित दूध म्हटले गेले आहे. देशी गायींच्या दुधाची प्रत उत्कृष्ट आणि मानवी आहारास पोषक असल्याने त्याची तुलना संकरित गायींच्या दुधाशी होऊच शकत नाही. यासाठी देशी गायी किती महत्त्वाच्या आहेत याचा विचार करून देशी गायींचे संवर्धन करण्याचा विचार व्हायला हवा.

---



## अलका इंगवले-देशमुख यांचा सत्कार

**सुराज्य/माळीनगर** : लोकनेते प्रतापसिंह मोहिते-पाटील यांच्या आशीर्वादाने व डॉ. धवलसिंह प्रतापसिंह मोहिते-पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली चौंडेश्वरवाडी ग्रामपंचायत सरपंचपदी अलका शिवाजीराव इंगवले देशमुख या ५९६ मतांनी निवडून आल्या. त्याबद्दल जनसेवा संघटनेच्या पदाधिकाऱ्यांच्यावतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी सत्कार करताना महाराष्ट्र राज्य जनसेवा संघटना प्रदेशाध्यक्ष माणिकराव मिसाळ, सोलापूर जिल्हा काँग्रेस कमिटी उपाध्यक्ष अण्णासाहेब शिंदे, सोलापूर जिल्हा जनसेवा अध्यक्ष शिवाजीराव इंगवले देशमुख, सवतगावचे माजी सरपंच बंडू, जाधव रमेश गायकवाड, मच्छिंद्र हजारे आदी उपस्थित होते



## जि. प. कन्नड शाळेतील मुलींचा विमानाने प्रवास

### मुख्याध्यापक महांतेश्वर कट्टिमनींचे दातृत्व

**सुराज्य/अक्कलकोट** : तालुक्यातील मैंदर्गी येथील जिल्हा परिषद शाळेतील ३० मुलींना मुंबई ते बंगलोर असा प्रवास विमानाने घडून मुख्याध्यापक महांतेश्वर कट्टिमनी यांनी आपले दातृत्व दाखविले आहे.

जिल्हा परिषदेच्या शाळेत शिकणाऱ्या शेतकऱ्यांच्या मुलींना सहलीला जाताना विमाने प्रवास करणे अशक्य असल्याने मुख्याध्यापक कट्टिमनी यांनी स्वखर्चातून मुलींचा विमानाने प्रवास घडवून आणला आहे. शाळेतील मुलींची सहल ही रविवार दि. ११ ते शुक्रवार दि. १६ डिसेंबर दरम्यान मुंबई, बंगलोर, मैसूर आदी ठिकाणी काढण्यात आली असून, यामध्ये मुंबई ते बंगलोर असा प्रवास विमानाने केला आहे. मुंबई येथील गेट ऑफ इंडिया, चैत्यभूमी, लालबाग गणपती, विधानभवन, मंत्रालय आदी आदी ठिकाणी भेट दिली आहे. तसेच बंगलोर येथे हायकोर्ट, विधानसभा, आदी ठिकाणी भेटी दिल्या. तर मैसूर येथे श्रावण बेळगूळ, गोमटेश्वर, ऐडेयूर सिध्देश्वर, श्रीरंगपट्टणम, चिंचणगिरी आदी ठिकाणी भेटी दिल्या आहे. यावेळी सोबत सुप्रिया बिराजदार, बसवराज हिप्परगी, रेखा सुतार, सुजाता सबसगी आदी होते.मुंबई येथून पुढे बंगलोरकडे जाताना विद्यार्थीना विमानाने प्रवास करावचा होता. यावेळी मुंबई विमान तळावर मुलींना घेऊन गेल्यानंतर विमानतळ आणि विमाने बघून मुलींच्या चेहऱ्यावरील आनंद वेगळाच होता. आयुष्यात कधी जवळून विमान न बघणाऱ्या विद्यार्थीना आता विमानाने प्रवास करायचा म्हटल्यावर त्याच्या चेहऱ्यावर खूप आनंद दिसले असल्याची माहिती मुख्याध्यापक कट्टिमनी यांनी सांगितले.

---

## पत्रकारांची मोफत तपासणी व औषधोपचार व्हावा : सातपुते

सुराज्य/पिलीव

**पत्रकार सुरक्षा समिती महाराष्ट्र राज्याचे प्रदेशाध्यक्ष यशवंतराव पवार यांच्या मार्गदर्शनाखाली पत्रकार सुरक्षा समिती माळशिरस तालुकाध्यक्ष सुजित दिगंबर सातपुते यांनी पत्रकारांच्या तपासण्या व औषधोपचारासंदर्भा विषयी निमा संघटनेला निवेदन दिले आहे.**

निवेदनात म्हटले आहे की, तालुक्यातील विविध ठिकाणच्या बातम्या संकलन करण्यासाठी पत्रकारांना आपल्या कुटुंबाकडे दुर्लक्ष करून वेळ काळ न बघता बातमी कव्हर करण्यासाठी धावपळ करावी लागते.सततच्या धावपळीमुळे प्रत्येक पत्रकाराचे आरोग्याकडे दुर्लक्ष होते व आरोग्याकडे दुर्लक्ष झाल्यामुळे विविध आजारांना पत्रकार बळी पडतात. त्यातच अनेक पत्रकारांची आर्थिक परिस्थिती बेताचीच असते. अशा मध्येच मोठमोठ्या आजाराला जर सामोरे जावे लागले तर घराचा प्रमुख असलेल्या पत्रकारांसमोर आरोग्याचा विषय हे एक गंभीर स्वरूपाचे आव्हान उभे राहते. त्यामुळे आपण माळशिरस तालुक्यातील विविध वर्तमान पत्राचे, साप्ताहिकाचे युट्यूब चॅनेलचे व न्युज पोर्टलचे जे काही पत्रकार बांधव असतील त्यांना आपल्या नॅशनल इंटी ग्रेटेड मेडिकल (निमा) संघटनेतील हॉस्पिटलच्या ठिकाणी मोफत तपासणी, सवलतीच्या दरात औषध उपचार व शस्त्रक्रिया करावी. सामाजिक बांधिलकी जपण्याच्या हेतूने सदर निवेदनाची दखल घेऊन तालुक्यातील पत्रकार बांधवांना सहकार्य करावे, अशा आशयाचे सुजित सातपुते यांनी नॅशनल इंटी ग्रेटेड मेडिकल असोसिएशनचे (निमा संघटना) माळशिरस तालुकाध्यक्ष डॉ. शिरीष रणवरे यांना निवेदन दिले आहे. यावेळी जेष्ठ पत्रकार दामोदर लोखंडे, शुभजीत नष्टे, प्रफुल्ल वाघमारे आदि उपस्थित होते.

## केंद्रस्तरीय विविध क्रीडा स्पर्धेत सलगर शाळेचे यश

सुराज्य/सोलापूर

सिध्देश्वर हायस्कूल सलगर येथे पार पडलेल्या केंद्रस्तरीय विविध क्रीडा स्पर्धेत जिल्हा परिषद प्राथमिक मराठी सलगर शाळेतील लहान गटातील मुलांनी कबड्डी खेळात अंतिम सामन्यात विजय प्राप्त केला. तसेच लहान गटातील मुलींनी लंगडी या खेळात अंतिम सामना बरोबरीत सोडविला. वैयक्तिक १०० मी धावणे या स्पर्धेत लहान गटातील पार्वती गणपती फुलारी या विद्यार्थिनीने द्रितीय क्रमांक पटकावला. लहान गटातील राजेश रुपण्णा पाटील या विद्यार्थ्याने तृतीय क्रमांक पटकावला.

वैयक्तिक १०० मी धावणे या खेळामध्ये मोठ्या गटातील विद्यार्थिनी वर्षा अमोगसिद्ध कुंभार हीने प्रथम क्रमांक पटकावला. तसेच चैतन्य गणपती पाटील या विद्यार्थ्याने १०० मी धावणे या खेळात द्रितीय क्रमांक प्राप्त केला. जिल्हा परिषद प्राथमिक मराठी सलगर शाळेतील लहान आणि मोठा गटातील विद्यार्थ्यांचे बीट स्तरावरील सामन्यांसाठी निवड झाली म्हणून शाळेचे मुख्याध्यापक दत्तात्रय पोतदार सर यांनी सर्व विद्यार्थ्यांचे आणि मार्गदर्शन करणाऱ्या सर्वच शिक्षकांचे कौतुक केले. ज्येष्ठ शिक्षक हणमंतराव गुंडरगी, मल्लिनाथ चनपटणे, बबिता कोरेकर, तबस्युम बागवान, हाजराबी बागवान, दिनकर भारती यांनी अभिनंदन केले



## आश्वासित प्रगती योजनेसह ७व्या वेतनाचा लाभ देण्याची मागणी

सुराज्य/सोलापूर

राज्यातील जे वरिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचारी अद्याप सातव्या वेतनापासून वंचित आहेत. त्यांना आश्वासित प्रगती योजनेसह सातव्या वेतनाचा लाभ तातडीने मिळावा, अशी मागणी सोलापूर कॉलेज कर्मचारी युनियनने केली आहे.

शासनाने २५ ऑगस्ट च्या आद्यादेशातील त्रुटी दूर करून सुधारित आदेश तातडीने काढावा. या मागणीसाठी युनियनचे अध्यक्ष दत्ता भोसले यांच्या अध्यक्षतेखाली छत्रपती शिवाजी रात्र महाविद्यालयात पदाधिकाऱ्यांची बैठक पार पडली या बैठकीत नेक मागण्यांबाबत चर्चा व विचार विनिमय करण्यात आला. यावेळी विद्यापीठ सिनेट सदस्य अजित संगवे, जनरल सेक्रेटरी राजेंद्र गिड्डे, खजिनदार राहुल खराडे, उपाध्यक्ष आनंद होटकर, सिध्देश्वर स्वामी, कार्याध्यक्ष अण्णा गवळी, विठ्ठल कोळी, शहाजी जाधव, संतोष अलकुंटे, भानुदास घंदुरे, दौलप्पा चाबुकस्वार, केशव लोंढे उपस्थीत होते.

## वांगी सरपंच सीता खडाखडे यांचा भाजपमध्ये प्रवेश

### वांगी-गावडेवाडी-मंद्रुप या दोन प्रमुख रस्त्यासाठी भाजपात

सुराज्य/दक्षिण सोलापूर

वांगी-गावडेवाडी व वांगी-मंद्रुप या दोन्ही गावांना जोडणारा प्रमुख रस्ता अशा अत्यंत जिव्हाळाचा विषय मार्गी लागावे. यासाठी मी भारतीय जनता पार्टी पक्षामधे प्रवेश केले असल्याची माहिती यावेळी नुतन सरपंच सीता लक्ष्मण खडाखडे यांनी दिली.

ग्रामपंचायत निवडणुकित वांगी गावच्या नुतन सरपंचपदी सीता लक्ष्मण खडाखडे हे विराजमान झाले.



या निवडणुकित त्यांनी पीर महादेव ग्रामविकास परिवर्तन पँनलच्या माध्यमातून निवडणूक लढवली व जनतेने त्यांना नुतन सरपंचपदी विराजमान केले जनतेचे दिलेला ऋण फेडण्यासाठी कार्यरत राहणार.

वांगी पिर महादेव ग्रामविकास परीवर्तन पॅनलकडून ओमप्रकाश जवळकोटे, सुज्ञानी सोनवणे, अरुण जवळकोटे असे एकूण तीन सदस्य निवडून आले आहेत. वांगीचे सरपंचसीता खडाखडे यांनी भारतीय जनता युवा मोर्चाचे महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष मनीष देशमुख यांच्या उपस्थित भाजपात प्रवेश केला. यावेळी दक्षिण सोलापूर भाजपा महिला तालुका अध्यक्ष दिपाली व्हनमाने,सुरज खडाखडे,महादेव भोपळे,चिदानंद जवळकोटे,संतोष भोपळे,अविनाश ठेंगे,उपमहापौर राजेश काळे,गुरण्णा तेली, महेश देवकर उपस्थित होते.

## गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगारांचे होणार ऑनलाईन नोंदणी

### वाहनमालकांच्या फसवणूक प्रकरणी मोहिते-पाटील यांच्या प्रश्नावर सहकारमंत्र्यांचे उत्तर

सुराज्य/अकलूज

भाजपचे आमदार रणजितसिंह मोहिते-पाटील यांनी माढा तालुक्यातील बेंबळे येथील प्रशांत भोसले यांची मध्यप्रदेशात ऊसतोड मजूर आणायला गेले असता तेथे त्यांची हत्या झाली व या संदर्भाने राज्यातील साखर कारखान्यांची वाहतूकदारांची ऊसतोड मजुर व मुकादमांकडून होणारी फसवणूक टाळण्याकरीता गोपीनाथ मुंडे महामंडळामार्फत कारखान्यांना ऊसतोड मजूर पुरविण्याच्या अनुषंगाने विधानपरिषदेत तारांकित प्रश्न उपस्थित केले.

आ. रणजितसिंह मोहिते-पाटील यांनी उपस्थित केलेल्या तारांकित प्रश्नांवर गाळप हंगाम २००४ ते २०२० या १६ वर्षांच्या कालावधीत राज्यातील ८१ साखर कारखान्यांची ऊसतोड मुकादमाकडून रुपये ३९ कोटी ४६ लाख ८४ हजार ३२२ ची फसवणूक झाल्याची कबूली देत ऊसतोड मजूर व मुकादमांकडून ऊस वाहतूकदार व साखर कारखानदार यांच्या होत असलेल्या फसवणुकीच्या प्रकारांवर आळा घालण्याबाबत तसेच ऊसतोड मजूर व मुकादम यांची गोपीनाथ मुंडे ऊसतोड महामंडळाकडे नोंदणी करुन महामंडळामार्फत ऊसतोड कामगार ज्या ठिकाणी वास्तव्याला आहेत व जे मागील तीन वर्ष ऊसतोड कामगार म्हणून काम करत असतील त्यांची ग्रामसेवकाने विहित नमुन्यात नोंदणी करुन ओळखपत्र देण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. तसेच राज्यातील ऊसतोड कामगारांच्या सर्वेक्षण/नोंदणीसाठी वेब व मोबाईल ॲप्लीकेशन महाआयटीमार्फत करुन घेण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार ऑनलाईन नोंदणीकरिता वेबपोर्टल तयार करण्याची कार्यवाही गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळाच्या स्तरावर सुरू असल्याची माहिती सहकारमंत्री अतुल सावे यांनी दिली.

## अनावश्यक ठिकाणी दिवे आवश्यक ठिकाणी अंधार

### हिवरे उपकेंद्रमधील व स्विच यार्डमधील कारभार

सुराज्य/चिखली

उपविभागीय कार्यालय मोहोळ महावितरण अंतर्गत असणाऱ्या हिवरे उपकेंद्रामधील स्विच यार्ड मध्ये अनावश्यक ठिकाणी दिवे तर आवश्यक ठिकाणी अंधाराचे साम्राज्य पसरल्याने अनुचित प्रकार घडण्याची शक्यता नाकारता येत आहे. तरी संबंधितांनी याकडे लक्ष देऊन तातडीने या ठिकाणच्या दिव्यांची सोय करावी अशी मागणी महावितरणच्या कर्मचारी वर्गातून करण्यात येत आहे.

उपविभागीय कार्यालय मोहोळ महावितरण अंतर्गत असणाऱ्या हिवरे उपकेंद्र येथील स्विच यार्ड मध्ये असणारे दिवे काही महिन्यांपूर्वीच बंद पडल्याने कर्मचाऱ्यांची मोठी समस्या निर्माण झाली आहे. सदर उपकेंद्राची उभारणी ज्यावेळी करण्यात आली त्यावेळी उजव्या आणि डाव्या बाजूला स्ट्रीट लाईटचे खांब उभारले असून त्यावर मर्क्युरी दिवे बसवून देखभाल करण्यासाठी उजेडाची सोय करण्यात आहे. मात्र, हेच दिवे काही महिन्यांपूर्वीच बंद पडल्याने त्याठिकाणी १० ते १२ व्हॅटचे एलइडी बल्प बसविले आहेत. तेही काही ठिकाणी चालू आहेत तर काही ठिकाणी बंद आहेत, जे काय चालू आहेत त्याचाही उजेड सर्वत्र पडत नसल्याने यदाकदाचित रात्री अपरात्री एखाद्या फिडरची एखादी मेन लाईनबंद पडली अथवा एखाद्या फिडरच्या लाईनचा घोटाळा झाला शिवाय वायरमन यांना लाईन बंद करून देण्याची वेळ आली तर स्विच यार्डमधील एबी स्विच खटका चेंज ओहर करताना तो खटका चेंज ओहर व्यवस्थित झाला का नाही याची खात्री लाईट उजेड नसल्याने कर्मचाऱ्यांना होत नाही. त्यामुळे लाईनवर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना लाईन बंद झाली का नाही याची खात्री होत नाही आणि उपकेंद्रामधील कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांना एबी स्विच खटका व्यवस्थीत चेंज ओहर झाला कि नाही याची खात्री होत नसल्याने कर्मचाऱ्यांना रात्रीच्यावेळी जीव मुठीत धरून काम करावे लागत आहे. तरी याकडे महावितरणच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तातडीने लक्ष केंद्रित करून हिवरे उपकेंद्राच्या स्विच यार्डमधील बंद पडलेले सर्व मर्क्युरी दिवे त्वरित दुरुस्त करून चालू करावे अशी मागणी होत आहे .

---

## केंद्र सरकार ग्रामस्थांसाठीच कार्यरत : खा. नाईक निंबाळकर

### वेळापूर येथील शायनिंग महाराष्ट्र प्रदर्शनाचे उद्‌घाटन

### पहिल्या दिवशी २५०० विद्यार्थी, नागरिकांनी पाहिले प्रदर्शन

सुराज्य/वेळापूर

केंद्र सरकार हे ग्रामीण भागातील नागरिकांसाठी असून सरकारच्या विविध योजना ग्रामीण भागातील नागरिकांना माहिती व्हाव्यात व त्याचा लाभ सर्वसामान्य नागरिकांना मिळावा यासाठी माळशिरस तालुक्यातील वेळापूर सारख्या ग्रामीण भागामध्ये शायनिंग महाराष्ट्र २०२२ या प्रदर्शनाचे आयोजन केले असल्याचे मत माढा लोकसभा मतदार संघाचे खासदार रणजितसिंग नाईक निंबाळकर यांनी व्यक्त केले.

माळशिरस तालुक्यातील वेळापूर येथील शिवशंभू मंगल कार्यालयात सांसा फाऊंडेशनच्या वतीने सुरू असलेल्या तीन दिवसीय शायनिंग महाराष्ट्र २०२२ या राष्ट्रीय प्रदर्शनाचे उद्‌घाटनप्रसंगी बोलत होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून पं. स. माजी सदस्य के के पाटील, माळशिरसचे नगराध्यक्ष आप्पासाहेब देशमुख, स्वेरींचे प्राचार्य बी. पी. रोंगे पाटील, सोलापूर जी. प. माजी सदस्य ज्योती पाटील आदी उपस्थित होते.



या प्रदर्शनात केंद्र सरकारचे आर. सी. एफ, महानगर गॅस, भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन, हिंदुस्थान पेट्रोलियम, निक्सी, एस.आय.डी.बी., एन.एफ. डी.बी.,जलशक्ती मंत्रालय, आय.सी.एम. आर, एन. एस. आय. सी., बी. आय. एस., जिओलोगिकल सर्व्हे ऑफ इंडिया. ,के. व्ही. आय. सी., कॉयर बोर्ड, मेढा, उत्तराखंड हंडलूम, मणिपूर आणि ओडिसा बांबू, झारखंड टुरिझम, डी.बी. टी. , एन. ए. टी. एम. ओ., सी.डी.बी. भारतीय रेल्वे आदी. सरकारी विभागांचे माहिती देणारे स्टॉल मांडण्यात आले आहेत.

प्रारंभी दत्ता थोरे यांनी प्रास्ताविक केले. सांसा फाऊंडेशनचे मनमोहन भास्कर यांनी पाहुण्यांचे स्वागत केले. तर आनंद पाल यांनी आभार मानले.

# दीशा सालियान मृत्यू प्रकरणी एसआयटी चौकशी

## फडणवीसांची घोषणा; आदित्य ठाकरे अडचणीत

✔ सुराज्य/नागपूर

**अभिनेता सुशांतसिंह राजपूत याची मॅनेजर दीशा सालियान हिच्या मृत्यू प्रकरणी आता एसआयटी चौकशी करण्यात येणार आहे. गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ही घोषणा केली आहे. दीशा सालियान मृत्यू प्रकरणी ज्याच्या कुठल्याही प्रकारची माहिती असेल त्याने ती पोलिसांकडे सादर करावी, असे उपमुख्यमंत्री आणि गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे. भाजप आणि शिंदे गटाच्या आमदारांनी या प्रकरणी एसआयटी चौकशीची मागणी केली होती.**

### मृतावस्थेत आढळली होती दीशा सालियान

दीशा सालियानने आत्महत्या केल्याचे वृत्त ८ जून २०२० ला देण्यात आले होते. पोलिसांच्या माहितीनुसार दीशाने आत्महत्या केली होती. पण तिची हत्या झाल्याचा आरोपही त्यावेळी झाला होता. त्यानंतर जवळपास ६ दिवसांनी अभिनेता सुशांतसिंह राजपूत हा आपल्या घरात मृतावस्थेत आढळून आला होता. यामुळे दीशाच्या मृत्यू प्रकरणी केंद्रीय मंत्री नारायण राणे यांचे पुत्र आणि आमदार नितेश राणे यांनी एसआयटी चौकशीची मागणी केली. यासोबतच या प्रकरणी शिवसेना नेते आदित्य ठाकरे यांची नार्को टेस्ट करण्याची मागणी केली. दीशा सालियान मृत्यू प्रकरणावरून विधिमंडळ अधिवेशनात सत्ताधारी पक्षांकडून चौकशीची मागणी करण्यात आली.

दीशा सालियान प्रकरणी आदित्य ठाकरेंच्या भूमिकेची चौकशी होणार आहे. यामुळे विरोधकांनी विधिमंडळात गदारोळ केला. यावेळी विरोधी पक्षांनी टीकटॉक स्टार पूजा चव्हाणच्या मृत्यू प्रकरणी चौकशी करावी अशी मागणी केली. पूजा चव्हाण हिच्या मृत्यू प्रकरणी शिंदे गटातील मंत्री संजय राठोड यांच्यावर गंभीर आरोप करण्यात आले होते. पूजाच्या कुटुंबीयांना न्याय देण्यासाठी चौकशी गरजेची आहे.

सुशांतसिंह राजपूत याची मैत्रीण रिया चक्रवर्ती हिला AU या नावाने एकूण ४४ फोन आले होते,



अशी माहिती देतानाच हा AU म्हणजे अनन्या उधास किंवा आदित्य-उद्धव (आदित्य उद्धव ठाकरे) असे असावे, असे शिंदे गटाचे खासदार राहुल शेवाळे हे बुधवारी म्हणाले होते.

## अधिवेशन कालावधीसाठी जयंत पाटील निलंबित

### अपशब्द वापरणे महागात पडले

✔ सुराज्य/नागपूर

**राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष आणि विधानसभा आमदार जयंत पाटील यांचे नागपुरातील हिवाळी अधिवेशनाच्या कालावधीसाठी निलंबन करण्यात आले आहे. विधानसभा अध्यक्षांबाबत बोलताना जयंत पाटील यांनी असंवैधानिक शब्द वापरल्याचा आरोप आहे. या मुद्द्यावर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्या दालनात बैठक झाली. त्यानंतर पाटील यांच्या निलंबनाचा निर्णय घेण्यात आला.**

नागपुरात विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनाचा चौथा दिवस सुरु आहे. यावेळी अभिनेता सुशांतसिंह राजपूतची एक्स मॅनेजर दिशा सॅलियन हिच्या संशयास्पद मृत्यू



प्रकरणाची एसआयटी चौकशी केली जाईल, असे उपमुख्यमंत्री आणि गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सभागृहात सांगितले.

यावेळी विरोधकांना बोलू दिले जात नाही, असे म्हणत विरोधीपक्षातील आमदार सभागृहाच्या वेलमध्ये उतरले. त्यावेळी जयंत पाटील यांनी विधानसभा अध्यक्षांना सुनावले.

यावेळी जयंत पाटील यांच्याकडून अध्यक्षांना उद्देशून असंविधानिक शब्दाचा वापर केल्याचा आरोप आहे.

## आदित्य ठाकरे खवळले

### ■ ३२ वर्षाच्या तरुणाने खोके सरकारला हलवून ठेवले आहे

✔ सुराज्य/नागपूर

एका ३२ वर्षांच्या तरुणाला हे खोके सरकार घाबरलंय आणि म्हणून बदनामीचे प्रयत्न होत आहेत. घोटाळेबाज, गद्दार मुख्यमंत्री हे ज्या एका प्रकरणात सापडलेले आहेत, त्या प्रकरणावरून विरोधकांना रोखण्याचा प्रयत्न ते करत आहेत. सत्ताधारी पक्षाचे आमदार सतत विधानसभेत गोंधळ घालत आहेत आणि विधानसभेचे अध्यक्ष असतील किंवा तालिका अध्यक्ष असतील ते आम्हांला बोलूच देत नाहीत.

सत्ताधारी पक्षातील १४ जणांना पाठोपाठ बोलू दिले गेले. यानंतर मग सभागृह स्थगित करायचे आणि पुन्हा तेच करायचे. अडीच वर्षात मी कधीच अशाप्रकारे विधानसभेचं कामकाज होताना बघितले नाही, असा आरोप





शिवसेनेचे नेते आदित्य ठाकरे यांनी शिंदे-फडणवीस केला आहे.

मी एवढी वर्षे टीव्हीवर विधानसभेचे कामकाज पाहतोय, संसदेचं कामकाज पाहतोय. पण सत्ताधारी पक्षच अशा प्रकारे आंदोलन करतोय, हे कधी दिसले नाही. 'राज्यपाल हटाव'ची जी सतत मागणी आम्ही करतोय, त्या मुद्द्याकडे लक्ष हटवण्याचा हा प्रयत्न आहे. महाराष्ट्रद्वेषी राज्यपालांनी महाराष्ट्राच्या विधिमंडळाचा अपमान केला, जनतेचा अपमान केला. छत्रपती शिवाजी महाराजांचा, महात्मा फुलेंचा अपमान केला. त्या राज्यपालांना वाचवण्याचा हा प्रयत्न आहे. घोटाळेबाज, गद्दार मुख्यमंत्र्यांना वाचवण्याचा हा प्रयत्न आहे. म्हणून याकडे सर्वांपासून लक्ष विचलित करण्याचा प्रकार सुरू आहे, असे आदित्य ठाकरे म्हणाले.

जे काही शोधायचे (दीशा सालियन प्रकरण) आहे ते शोधू द्या. महत्त्वाची गोष्ट हीच आहे, एनआयटीचा जो भूखंड घोटाळा आहे, तो आम्हांला विधिमंडळात काढू देत नाहीएत आणि म्हणून हे सर्व चाललेले आहे, अशी टीका आदित्य ठाकरे यांनी केली आहे.

दीशा सालियन प्रकरणात नार्को टेस्ट करण्याची मागणी विरोधकांनी केली आहे. यावरही आदित्य ठाकरे बोलले. अशा लोकांकडे मी लक्ष देत नाही. एका ३२ वर्षांच्या तरुणाने या खोके सरकारला हलवून ठेवले आहे, असे म्हणत आदित्य ठाकरे यांनी सत्ताधाऱ्यांवर निशाणा साधला आहे.

## भाजपाच्या आमदार मुक्ता टिळक यांचे पुण्यात निधन



✔ सुराज्य/पुणे: भाजपाच्या आमदार आणि पुण्याच्या माजी महापौर मुक्ता टिळक यांचे गुरुवारी दीर्घ आजाराने निधन झाले आहे. पुण्यातील गॅलक्सी केअर रुग्णालयात त्यांच्यावर उपचार सुरू होते. अखेर ३ वाजून ३० मिनिटांनी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. आज (शुक्रवारी) सकाळी त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार होणार आहेत.

मुक्ता टिळक या गेल्या अनेक महिन्यांपासून कर्करोगाशी झुंज देत होत्या. पुण्यातील कसबा पेठ विधानसभा मतदारसंघातील त्या विद्यमान आमदार होत्या. तसेच पुण्यातील भाजपा नेत्यांच्या यादीत त्यांचे मानाचे स्थान होते तर, २०१७ ते २०१९ या काळात त्यांनी पुण्याच महापौर पदही भूषवले होते.

## फोन टॅपिंग प्रकरणी विधानसभेत राडा

### नाना पटोले भिडले, अजित पवार अध्यक्षांना नडले!

✔ सुराज्य/मुंबई

फोन टॅपिंग प्रकरणी पुणे पोलिसांनी सादर केलेला केलेला क्लोजर रिपोर्ट न्यायालयाने फेटाळल्यानंतर विरोधी पक्षाने आक्रमक पवित्रा घेऊन विधानसभा दणाणून सोडली. फोन टॅपिंग प्रकरणी आयपीएस अधिकारी रश्मी शुक्ला यांच्यावर गुन्हे दाखल झाले. पण सरकार बदलल्यानंतर त्यांना पाठीशी घालण्याचे प्रकार सुरु झाले आहेत. प्रश्नोत्तराचा तास बाजूला ठेवून फोन टॅपिंगविषयी चर्चा करावी, या मागणीसाठी विरोधकांनी वेलमध्ये येऊन जोरदार घोषणाबाजी केली. पण कामकाज नियमाप्रमाणेच चालेल. नियमाप्रमाणे एक तास आधी सूचना येणे आवश्यक आहे, त्यामुळे ही सूचना नाकारण्यात येत असल्याचे सांगून विधानसभा अध्यक्षांनी यावर चर्चा घेण्यास नकार दिला. त्यावर विधानसभेचे अध्यक्ष सरकारला पाठीशी घालत



आहात, त्यामुळे आम्ही वॉक आउट करतो, असे म्हणून विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी मविआ आमदारांना साथीला घेऊन विधानसभेतून सभात्याग केला.

राजकीय नेत्यांच्या फोन टॅपिंग प्रकरणात राज्यात झालेल्या सत्तांतरानंतर आयपीएस अधिकारी रश्मी शुक्ला यांना क्लिनचिट मिळाली होती. त्यानंतर पुणे पोलिसांनी न्यायालयात क्लोजर रिपोर्ट सादर केला होता. पण न्यायालयाने क्लोजर रिपोर्ट फेटाळल्याने विरोधकांना गुरुवारी बळ मिळाली. अधिवेशनाच्या गुरुवारी चौथ्या दिवशी नाना पटोले यांनी फोन टॅपिंग प्रकरणातला मुद्दा उपस्थित करत सरकारच्या भूमिकेवर कडाडून प्रहार केला.

माझा फोन टॅप करण्यात आला. यात तत्कालिन गृहमंत्र्यांचा थेट संबंध आहे. असे सगळे असताना आणि न्यायालयाने क्लोजर रिपोर्ट फेटाळलेला असताना याविषयी विधानसभेत चर्चा झाली पाहिजे, अशी मागणी नाना पटोले यांनी केली. पण अध्यक्षांनी चर्चेस परवानगी नाकारल्याने विरोधी पक्षाच्या आमदारांनी वेलमध्ये येऊन जोरदार घोषणाबाजी केली.

## चार्ल्स शोभराजची जेलमधून होतेय सुटका

### भारतासह ९ देशांना डोकेदुखी ठरला होता बिकिनी किलर

✔ सुराज्य/नवी दिल्ली



**बिकिनी किलर म्हणून कुप्रसिद्ध चार्ल्स शोभराजची गुरुवारी संध्याकाळपर्यंत तुरुंगातून सुटका होण्याची शक्यता आहे. नेपाळच्या सर्वोच्च न्यायालयाने बुधवारी सायंकाळी उशिरा शोभराजची तुरुंगातून सुटका करण्याचे आदेश दिले होते. न्यायालयाच्या निर्णयाची प्रत तुरुंग प्रशासनापर्यंत पोहोचू न शकल्याने बुधवारी रात्री सुटका होऊ शकली नाही.**

शोभराजचे (चार्ल्स शोभराज) वकील न्यायालयाच्या निर्णयाची लेखी प्रत तुरुंगात पोहोचवण्याचा प्रयत्न करत आहेत जेणेकरून त्याच्या सुटकेची प्रक्रिया सुरू होईल. शोभराजच्या वकील शकुंतला विश्वास यांनी सांगितले की, गुरुवारी शोभराजची तुरुंगातून सुटका होऊ शकते.

वृद्धापकाळ आणि खालावलेली तब्येत या कारणांमुळे शोभराजच्या सुटकेची मागणी करण्यात आली होती. नेपाळमध्ये दोन परदेशी महिलांच्या हत्येप्रकरणी शोभराजला दोषी ठरवून जन्मठेपेची २० वर्षांची शिक्षा सुनावण्यात आली होती. १९ वर्षे तुरुंगात राहिल्यानंतर नेपाळच्या सुप्रीम कोर्टाने नेपाळच्या तुरुंग नियम आणि कायद्याच्या आधारे शोभराजची सुटका करण्याचे आदेश दिले आहेत.

मूळचा व्हियेतनामचा असलेल्या चार्ल्स शोभराजचा जन्म १९४४ मध्ये व्हियेतनामच्या एका शहरात झाला होता. त्याची आई व्हियेतनामची आणि वडील मूळचे भारतीय होते. चार्ल्सने त्याची काही वर्षे आशिया आणि फ्रान्समध्ये घालवली. शोभराजची आई व्हियेतनाममधील आणि वडील एक सिंधी भारतीय होते.

## बबनराव पाचपुते यांची प्रकृती खालावली

### विधिमंडळातून थेट रुग्णालयात दाखल



✔ सुराज्य/मुंबई : भाजपचे ज्येष्ठ नेते आणि आमदार बबनराव पाचपुतेंची प्रकृती खालावली असून त्यांना विधिमंडळातून थेट रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. विधान भवनात बबनराव पाचपुते यांना श्वसनाचा त्रास सुरू झाला. मागील अनेक दिवसांपासून ते आजारी आहेत.

विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनाला सुरुवात झाली आहे. परंतु, हे अधिवेशन सुरू असताना बबनराव पाचपुते यांना अचानक त्रास सुरू झाला. त्यानंतर त्यांच्या सहकाऱ्यांनी परिसरातील प्राथमिक आरोग्य केंद्रात नेले आणि तिथे डॉक्टरांनी त्यांची तपासणी केली. डॉक्टरांनी त्यांना शासकीय रुग्णालयात दाखल करण्याचा सल्ला दिला. परंतु पाचपुते यांच्या विनंतीवरून त्यांना खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

## राहुल शेवाळे अडचणीत

### ▶ रेपप्रकरणी एसआयटी चौकशीचे निर्देश

✔ सुराज्य/नागपूर

**राहुल शेवाळे यांनी लोकसभेत दिशा सालिअनप्रकरणी आदित्य ठाकरेंवर दोषारोप केल्यानंतर आज त्याचे पडसाद विधान परिषदेत उमटले. दिशा सालिअन प्रकरणाची एसआयटी चौकशीचे आदेश राज्य सरकारने दिलेले असताना राहुल शेवाळे यांच्याविरोधातही एसआयटी चौकशी व्हावी, अशी मागणी शिवसेना आमदार मनिषा कायंदे यांनी केली आहे. त्यांची मागणी मान्य झाली असून विधान परिषदेच्या सभापती निलम गोऱ्हे यांनी राहुल शेवाळे प्रकरणात एसआयटी चौकशीचे निर्देश राज्य सरकारला दिले आहेत.**

राहुल शेवाळे यांनी एका महिलेवर बलात्कार केल्याचा आरोप जुलै महिन्यात करण्यात आला होता. लग्नाचे आमिष दाखवून खासदार राहुल शेवाळे यांनी आपले मानसिक आणि शारीरिक शोषण केले असा आरोप दुबईतील एका व्यापारी महिलेने केला होता.



याप्रकरणी तिने पोलिसांत तक्रारही दाखल केली आहे.

या पीडित महिलेला याप्रकरणी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घ्यायची, लोकसभा सेक्रेटरीला भेटायचे आहे. मुंबई पोलीस आयुक्तांना भेटायचे आहे. पण याप्रकरणात पोलीस हस्तक्षेप करत नाही. तिला मुंबईत यायचे आहे, परंतु, राजकीय दबावापोटी ती मुंबईत येऊ शकत नाही, याप्रकरणी मी उपमुख्यमंत्री आणि गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र दिले आहेत. या प्रकरणात एसआयटी चौकशीची मागणी करत आहे, असे मनिषा कायंदे म्हणाल्या. नितेश राणेंसह सत्ताधाऱ्यांनी अध्यक्षांच्या व्हेलसमोर येत आंदोलन केले. गदारोळ वाढल्यानंतर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकरणात एसआयटी चौकशीचे आदेश दिले आहेत.

## जिल्हाधिकाऱ्यांची अभिमान वाटेल अशी कामगिरी

✔ सुराज्य/अहमदनगर

**अहमदनगरचे जिल्हाधिकारी राजेंद्र भोसले यांनी एक कौतुकास्पद कार्य केलं आहे. त्यांच्या कार्यक्षेत्रातील १२ ते १६ वर्षे वयोगटातील १९ मजुरांची ओळख पटवून सुटका केली आहे. राज्यातील असा पहिलाच उपक्रम आहे.**

मजूर म्हणून काम करणाऱ्या या १९ मुलांना इगतपुरीहून आणले होते. ते इथे मेंढपाळ म्हणून काम करत होते. मेंढपाळ म्हणून आणले होते. जिल्हाधिकाऱ्यांनी त्यांची सुटका केली आहे. तसंच, २७ जानेवारी २०२२ पासून लागू झालेल्या पुनर्वसनाच्या केंद्रीय योजनेंतर्गत या मजुरांना प्रत्येकी ३०,००० रुपये तात्काळ आर्थिक मदत





देण्यात आली आहे.

वेठबिगार मजुरांच्या सुटकेसाठी राज्यात पुढाकार घेणारे जिल्हाधिकारी राजेंद्र भोसले आता मुलांच्या पुनर्वसनासाठी योजना तयार करत आहेत. कामगार विभाग आणि स्थानिक पोलिस प्रशासनाच्या मदतीने आम्ही मजुरांची सुटका केली.

आर्थिक मदत देण्याव्यतिरिक्त जिल्हा प्रशासनाने काही व्यक्तींवर वेठबिगार कामगार प्रणाली (निर्मूलन)

### १९ मुलांना दिले नवे आयुष्य

कायद्याच्या तरतुदींनुसार गुन्हा दाखल केला आहे, ज्यामध्ये किमान तीन वर्षांची शिक्षा आणि २,०० रुपये दंडाची तरतूद आहे. मुलांची सुटका करण्यात आली आहे. ते पुन्हा मजुरी करणार नाहीत याची आम्ही काळजी घेऊ, असे भोसले यांनी म्हटले आहे.

दरम्यान, केंद्र सरकारच्या निर्देशांनुसार, जिल्हा प्रशासनाने सरकारी विभागांसोबत समन्वय साधून वेठबिगारी कामगार म्हणून कामावर ठेवलेल्या मुलांचे संगोपन करण्यासाठी सुरक्षित वातावरण उपलब्ध करून देण्यासाठी उपाययोजना करणे अपेक्षित आहे. त्यांचे शिक्षण सुनिश्चित करण्यासाठी सुविधा, शारीरिक-सामाजिक समुपदेशन, इयत्ता १२वी पर्यंत अल्प मुक्कामासाठी घरे आणि कौशल्य विकास हे पुनर्वसन योजनेचे अविभाज्य घटक आहेत.

महिला मजुरांच्या विशेष गरजा पूर्ण करण्यासाठी, सरकारला लग्नासाठी आर्थिक मदत देखील द्यावी लागते. अपंग व्यक्तींसाठी, राष्ट्रीय धोरणानुसार विशेष योजना उपलब्ध करून द्यावी लागते.

## गर्दीच्या ठिकाणी पुन्हा मुखपट्टी

### कोरोना प्रतिबंधक उपाय योजण्याची केंद्राची राज्यांना सूचना

नवी दिल्ली, पुणे, नागपूर : चीनसह अन्य देशांत पुन्हा करोनाचा उद्रेक झाल्याने भारताची आरोग्य यंत्रणा सतर्क झाली आहे. गर्दीच्या ठिकाणी मुखपट्टीचा वापर, लसीकरण पूर्ण करण्याबरोबरच अन्य उपाययोजना करण्याचा सल्ला केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने बुधवारी राज्यांना दिला.

चीनमध्ये कोरोनाच्या नव्या उत्परिवर्तनामुळे मोठी रुग्णवाढ नोंदविण्यात येत असल्याच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय आरोग्यमंत्री मनसुख मांडवीय यांनी बुधवारी तज्ज्ञांसह वरिष्ठ अधिकाऱ्यांची बैठक घेतली. कोरोनासाथ अद्याप संपलेली नाही. त्यामुळे रुग्णसंख्या कमी



असली तरी कोरोना प्रतिबंधक उपाययोजनांवर भर द्यायला हवा. गर्दीच्या ठिकाणी मुखपट्टीचा वापर करण्याबरोबरच वर्धक मात्रेसह संपूर्ण लसीकरणासाठी प्रयत्नशील राहावे'', असे मांडवीय यांनी सांगितले.

देशात सध्या कोरोनाचे ३,४०८ उपचाराधीन रुग्ण आहेत. देशात कोरोनाची रुग्णसंख्या कमी असली तरी चीनसह अन्य देशांत मोठी रुग्णवाढ नोंदविण्यात येत आहे.

## एटीएम कार्डची अदलाबदल; वृद्धास ४० हजाराला फसवले

**सोलापूर** : एटीएम कार्डची अदलाबदल करत एका वृद्धाच्या खात्यातून चाळीस हजार रुपये काढून फसवणूक केल्याप्रकरणी दोन अनोळखी इसमाविरुद्ध जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.ही घटना दि.८ डिसेंबर रोजी सायंकाळी साडेसहा वाजण्याच्या दरम्यान एसबीआय शाखा जुना बोरामणी नाका येथे घडली.याप्रकरणी भीमा गोलू चव्हाण (वय-६१,रा.मु.पो मुळेगाव तांडा) यांनी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. भीमा चव्हाण यांच्या बचत खात्यामधून पैसे काढण्यासाठी दि.१८ डिसेंबर रोजी एसबीआय शाखा जुना बोरामणी नाका येथे गेले होते.त्यावेळी एटीएम मशीन केंद्राच्या आत उभे असलेल्या दोन अनोळखी इसमांनी भीमा यांनी मशीनमध्ये टाकलेले एटीएम कार्ड बदलून व त्यांची दिशाभूल केली. गोपाल नावाच्या व्यक्तीने त्यांच्या खात्यातून बेकायदेशीरपणे चाळीस हजार रुपये काढून घेऊन फसवणूक केली आहे. तपास पो.ह.ओहळ हे करीत आहेत.

## कारच्या धडकेत एकाचा मृत्यू; चालकावर गुन्हा दाखल

**सोलापूर** : दुचाकी कारच्या धडकेत एकाचा मृत्यू झाल्याप्रकरणी कारचालकाविरुद्ध फौजदार चावडी पोलीस ठाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.ही घटना दि.१ डिसेंबर रोजी पहाटे साडेतीन वाजण्याच्या दरम्यान एमजी मोटर्स समोर हायवेवरील बाळे येथे घडली.याप्रकरणी परशुराम रामचंद्र बरगले (वय-५२,रा.मु.पो. नागणसुर, ता. अक्कलकोट) यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून कार क्र.एम.एच.१३. एन.९५४४ या क्रमांकाच्या चालकाविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. बरगले यांचा भाचा संजय मुदीन केरी (वय-३२,रा. मु.पो.नागणसूर) हा दुचाकीवरून त्याचा मित्र विजय खाजप्पा निलंगे (वय-२५,रा. नागणसूर) सोबत वरील ठिकाणी जात असताना पाठीमागून आलेल्या कारने त्यांच्या दुचाकीला धडक दिली. यात दिल्याने विजयचा मृत्यू झाला आहे. संजय केरी हे जखमी झाले आहेत. तपास पो.ह. भोईटे हे करीत आहेत.

## दिव्यांगांना सहाय्यक उपकरण वाटप कार्यक्रम राबविणार: महास्वामी

**सोलापूर** : सोलापूर जिल्ह्यातील दिव्यांगांना सहाय्यक उपकरणाअभावी अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. त्यांना सर्व प्रकारच्या दिव्यांग सहाय्यक उपकरणे वाटपाचे करण्यासाठी सोलापूर जिल्ह्यात विशेष कार्यक्रम आयोजित करण्याची मागणी खा. डॉ. जयसिद्धेश्वर शिवाचार्य महास्वामीजी यांनी केंद्रीय सामाजिक न्याय व सक्षमीकरण मंत्री विरेंद्रकुमार यांच्याकडे केली आहे. संसदीय अधिवेशन काळात याबाबत निवेदन देत सोलापुरातील दिव्यांगांच्या समस्या सूर करण्याची मागणी केली आहे. सोलापूर जिल्हा हा तेलंगणा आणि कर्नाटक राज्याच्या सीमेलगत आहे. त्यामुळे.दोन्ही राज्यातील अनेक कामगार सोलापुरात राहतात. वस्त्रोद्योगासह पूरक व्यवसाय करणारे लाखो कामगार सोलापुरात आहेत. यासह सोलापुरात मोठ्या प्रमाणात विडी व्यवसाय तसेच इतर लघु उद्योगात कार्यरत असणारे हजारो कामगार, मजूर आहेत. त्यातील अनेक दिव्यांग स्त्री-पुरुष आहेत. आर्थिक परिस्थितीमुळे दिव्यांगांना बाजारातून साधने खरेदी करता येत नाहीत. म्हणून, सोलापूर जिल्ह्यात दिव्यांग सहाय्यक उपकरणे वाटपाचे विशेष कार्यक्रम आयोजित करण्याची मागणी खा. डॉ. जयसिद्धेश्वर शिवाचार्य महास्वामीजी यांनी केली.

# दागिने लुटणाऱ्या अट्टल आरोपींना अटक; चार लाखांचा ऐवज हस्तगत

- फौजदार चावडी पोलिसांची कामगिरी
- खंडोबा मंदिर व स्टँड परिसरात घडली होती घटना

सुराज्य/सोलापूर

फौजदार चावडी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील बाळे येथील खंडोबा मंदिर व एसटी स्टँड येथे गर्दीचा फायदा घेऊन सोन्याचे गंठण व मंगळसूत्र असे दागिने चोरी करणाऱ्या आरोपींना पोलिसांनी अटक करून त्यांच्याकडून १४ तोळे सोन्याचे दागिने असा एकूण ४ लाख २ हजार ९०० रुपये किमतीचे दागिने हस्तगत केला आहे.

संजय शंकर जाधव (वय-३६,रा.विठ्ठल मंदिर शेजारी सेटलमेंट फ्री कॉलनी नंबर -३), कावेरी नागेश जाधव (वय-२६, रा.लिंमयेवाडी सेटलमेंट), सुचित्रा उर्फ सना ज्ञानेश्वर जाधव (वय-३५, रा.होटगी गाव, सध्या-आसरा चौक, अश्विनी प्रकाश जाधव (वय-३३, रा.भांडुप, जिल्हा ठाणे) व पुष्पा शंकर गायकवाड (वय-६०, रा.सेटलमेंट फ्री कॉलनी नंबर-५) अशी आरोपींची नावे आहेत. ते सध्या न्यायालयीन कोठडी आहेत. शीला तमशेट्टी (वय-६०, रा.भवानी पेठ सोलापूर) व छाया सूर्यकांत दोडके (वय-४८,रा.रामराज्य नगर, शेळगी) या दि.४ डिसेंबर रोजी बाळे येथील खंडोबा मंदिर येथे देवदर्शनासाठी गेल्या होत्या. त्यावेळी गर्दीचा फायदा घेत चोरट्यांनी फिर्यादी यांचे सोन्याचे मंगळसूत्र चोरी करून नेले होते.यासंदर्भात त्यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली होती. त्यानुसार पोलीस तपास करीत असताना त्यांना एक पुरुष व एक महिला लक्ष्मी मार्केट येथे चोरीचे दागिने विक्री करण्यासाठी घेऊन येणार असल्याची माहिती मिळाली.



### ‘पुष्पा’सह पाच जण ताब्यात

बाळे येथील खंडोबा मंदिर व एसटी स्टँड परिसरातून गर्दीचा फायदा घेत आरोपी यांनी दागिने चोरले होते. दरम्यान पोलिसांनी दोन वेगवेगळ्या ठिकाणी सापळा लावून पुष्पासह चार महिला एक पुरुषाला ताब्यात घेतले आहे. ही चोरी त्यांनी स्वतःच्या उपजीविकेसाठी केल्याचे पोलिसांना सांगितले.

त्यावेळी पोलिसांनी दोघांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडे सोन्याचे दागिने मिळून आले. त्यांनी आपली नावे संजय जाधव व कावेरी जाधव असे सांगितली.

तसेच दि.२९ ऑक्टोंबर रोजी स्नेहा बादगुडे (वय-२२,रा.शेळगाव, ता.बार्शी) या बार्शी बसमध्ये चढत असताना चोरट्यांनी त्यांची पर्सची चैन उघडून पाच तोळे वजनाचे दागिने चोरून नेले. फौजदार चावडी पोलिसांनी य आरोपींचा शोध घेत असताना चोरलेले सोन्याचे दागिने मल्लिकार्जुन मंदिर येतील एका गल्लीत विक्रीकरिता आरोपी येणार असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. पोलिसांनी आरोपी सुचित्रा, अश्विनी जाधव व पुष्पा जाधव यांना ताब्यात घेतले.फौजदार चावडी पोलिसांननी तीन गुन्हे उघडकीस आणले आहे.तसेच गुन्ह्यातील एकूण १४ तोळे सोने जप्त केले आहे. ही कामगिरी स.पो.नि.शंकर धायगुडे, पोलीस हवलदार दीपक डोके, कटारे, धनंजय बाबर, आयाज बागलकोटे, अर्जुन गायकवाड, कृष्णा बडुरे, विनोद व्हटकर, नितीन मोरे, सचिनकुमार लवटे, अमोल खरटमल,अजय चव्हाण, संतोष चानकोटी, शशिकांत दराडे, नागनाथ गुळवे यांनी ही कामगिरी केली.



## जांबमुनी महाराजांच्या जयंतीनिमित्त बाबा ग्रुपतर्फे मिरवणूक

**सोलापूर** : सालाबादप्रमाणे यंदाही जांबमुनी महाराजांची जयंती बाबा ग्रुप बहुउद्देशीय सामाजिक संस्थेच्यावतीने मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. प्रथम जांबमुनी महाराजांच्या मूर्तीचे पूजन काँग्रेसचे अध्यक्ष चेतन नरोटे, सुधीर खरटमल, विनोद भोसले, वैष्णवी करगुळे, संस्थेचे संस्थापक अध्यक्ष अंबादास करगुळे, संजय हेमगड्डी, आदींच्या हस्ते करण्यात आली. मूर्तीचे पूजन होताच जय जांबवंत, श्री आदी जांबमुनी महाराज की जय च्या जयघोषात मिरवणुकीस प्रारंभ करण्यात आला. मिरवणुकीत डीजेच्या ठेक्यावर अंबादास करगुळे यांच्यासह तरुणाई थिरकली. याप्रसंगी उत्सव अध्यक्ष राहुल यमकोटे, मल्लू म्हेत्रे, यल्लप्पा अजय अवलुर तुपदोळकर, रमेश बेरे, देवा गायकवाड, अमर हळ्ळी, स्वप्नील म्हेत्रे, गणेश म्हेत्रे, ओमकार पल्ले, अविनाश आसादे मानतेश कुळूर, आनंद पुंडा, मारू करगुळे,अंजन बॉस जंगम भगवान करगुळे, नागेश साखरे, अप्पाशा सन्नके, महिला, पुरुष व आदी पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## बेकायदेशीर जमाव जमवून आंदोलन; सहाजणांवर गुन्हा

सुराज्य/सोलापूर

बेकायदेशीररित्या जमा जमवून आंदोलन केल्याप्रकरणी सहा जणांविरुद्ध सदर बाजार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. बाळासाहेब वाघमारे सचिन केरू जाधव, आनंद चंदनशिवे, प्रमोद गायकवाड, सुहास सावंत, रॉकी इंगळे असे गुन्हा दाखल करण्यात आलेल्यांची नावे आहेत. ही घटना दि.२१ डिसेंबर रोजी सकाळी ११ ते ४ वाजण्याच्या दरम्यान डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यासमोर घडली.

आंदोलन करण्यास परवानगी नसल्याबाबत आव्हान करून देखील वरील संशयित आरोपी यांनी साधारण एक ते बाराशे लोकांचा बेकायदेशीर जमाव जमवून आपली भाषणे करून रस्त्यावरील येणाऱ्या जाणाऱ्या लोकांना अडथळा निर्माण करत वाहतूक कोंडी निर्माण केली आहे. अशा आशयाची फिर्याद पोह.भालू सूर्यकांत जाधव यांनी सदर बझार पोलीस ठाण्यात दिली आहे.घटनेचा पुढील तपास पोह.कंचे हे करीत आहेत.



## सोलापूर शहर राष्ट्रवादीची राज्य शासनाच्या विरोधात निदर्शने

**सोलापूर** : प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांना हिवाळी अधिवेशनामध्ये निलंबनाची कारवाई करण्यात आली यांच्या निषेधार्त डॉ. बाबासाहेब आंबडेकर चौकात राष्ट्रवादीच्या वतीने निदर्शने करत राज्यशासनाचा निषेध करण्यात आला. जयंत पाटील यानी विधानसभेचे अध्यक्षाना अपशब्द वापरल्यामुळे हिवाळी अविवेशन संपेपर्यंत निलंबन करण्यात आले आहे. यांचे पडसाद सोलापुरात उमटले आहेत. राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने पार्क चौकात ज राज्यशासनाचा निषेध करण्यात आला निर्लज्ज सरकारचा निर्लज्जपणा अशा घोषणा देण्यात आल्या. यावेळी भारत जाधव, प्रमोद गायकवड, किसन जाधव, जुबेर बागवान, मनोहर सपाटे, सुहास कदम, प्रशांत बाबर, प्रमोद भोसले, सुनिता रोटे, फुटाणे रेखा सपाटे यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

## डफरीन हॉस्पिटल नुतनीकरणाचे काम अंतिम टप्प्यात; आयुक्त आज करणार पाहणी

सुराज्य/सोलापूर

शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या सोलापूर महापालिकेच्या डफरीन हॉस्पिटलचे नूतनीकरणाचे काम अंतिम टप्प्यात आले आहे. सर्व सुविधायुक्त ही रुग्णालय करण्यात येत आहे. दरम्यान दरम्यान शुक्रवारी महापालिका आयुक्त शितल तेली - उगले या येथील रुग्णालयाची पाहणी करणार आहेत.

गरीब-गरजूंसह शहरातील नागरिकांना वैद्यकिय सेवा उपलब्ध करून देण्यासाठी प्रशासनाकडून प्राधान्य राहणार आहे. या अनुषंगाने महापालिकेचे डफरीन हॉस्पिटल सज्ज करण्याचा पूर्ण प्रयत्न राहणार असल्याची माहिती महापालिका आयुक्त शीतल तेली-उगले यांनी दिली.

या रुग्णालयांमध्ये येणाऱ्या नागरिकांना प्राथमिक उपचाराबरोबरच इतर सोयी-सुविधा देण्यामध्ये कुठेही कमतरता नसावी. उपचारासाठी लागणारे औषधे आणि इतर उपकरणे सज्ज रहावे. महापालिका निधी उपलब्ध करून सर्व दवाखाने सज्ज करतानाच रुग्ण व नातेवाईकांसाठी लागणाऱ्या इतर सेवाही देण्याचा प्रयत्न राहणार आहे. दरम्यान, शुक्रवारी आयुक्त शितल तेली-उगले या महापालिकेच्या डफरील हॉस्पिटलची पाहणी करणार असून तेथे झालेल्या कामाची, उपलब्ध केलेल्या उपकरणांची व इतर बाबींची माहिती घेणार आहेत.

### स्मार्ट सिटीच्या बैठकीत घेतला आढावा

स्मार्ट सिटी प्राधिकरणाची वार्षिक सर्वसाधारण बैठक गुरुवारी झाली. यामध्ये विविध प्रकल्पांचा आढावा आणि मागील बैठकीतील निर्णयावर चर्चा झाली. अशी माहिती स्मार्ट सिटीच्या सीईओ तथा आयुक्त शितल तेली उगले यांनी दिली.

## वारकरी मंडळातर्फे हरिनाम सप्ताहाचे आयोजन

**सोलापूर** : सोलापूर शहर अखिल भारतीय वारकरी मंडळाच्या वतीने श्री संत शिरोमणी नामदेव महाराजांच्या सप्तशतकोत्तर सुवर्ण महोत्सव निमित्त २५ डिसेंबर ते १ जानेवारी २०२३ पर्यंत अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आल्याची माहिती राष्ट्रीय अध्यक्ष हभप प्रकाश महाराज बोधले यांनी गुरुवारी पत्रकार परिषदेत दिली.

एनजी मिल चाळ कंपाऊंड, भैय्या चौक येथे होणार आहे. या सप्ताह मध्ये स काकड भजन, तुकाराम गाथा परायण, द संगीत महिला भजन, हरिपाठ, हरिकीर्तन हरिजागर आदी कार्यक्रम होणार आहे. खा. जयसिद्धेश्वर शिवाचार्य महास्वामी यांचे प्रवचन व गुरुबाबा औसेकर यांच्या चक्रीभजनाने सप्तहास सुरुवात होणार आहे. अमृत महोत्सव निमित्त ३१ डिसेंबर रोजी दुपारी ३ वाजता ७५ मृदंग वादकासह दिंडीचे आयोजन करण्यात आले आहे. या पत्रकार परिषदेस जिल्हाध्यक्ष किरण महाराज बोधले, श्रीहरी नाशिककर, शहराध्यक्ष सुभाष शिंदे महाराज, पोतदार महाराज, श्रीनिवास चव्हाण महाराज, आदिनाथ जावळे महाराज, भास्कर पवार महाराज आदी उपस्थित होते.

## उपनेत्या सुषमा अंधारे २५ रोजी कुर्डूवाडीत

**कुर्डूवाडी** : उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांची कुर्डूवाडी शहरातील गांधी चौकामध्ये दि.२५ रोजी सायंकाळी ६ वाजता सभा आयोजित करण्यात आली आहे. सुषमा अंधारे सभेत आरोग्य मंत्री तानाजी सावंत यांच्यावर तोफ डागणार का? याचबरोबर कोणाकोणाच्या विषयांवर बोलणार याबाबत सर्वत्र चर्चा सुरू आहे.

कुर्डूवाडी शहरातील नगरपरिषदेची सत्ता गेल्या पंचवीस वर्षापासून उद्धव ठाकरे गटाचे जिल्हाप्रमुख धनंजय डिकोळे यांच्या नेतृत्वाखाली भगवा फडकत आहे. दर निवडणुकीमध्ये आघाडी, महाविकास आघाडी, भीमशक्ती शिवशक्ती अशा प्रकारे विविध आघाड्यां करून निवडणुकींचे समीकरण घालून कुर्डूवाडी नगरपालिकेवर सत्ता कायम ठेवत यश मिळवले आहे. तर या दरम्यान इतर कोणताही राजकिय पक्ष मोठा झाला नाही. तर सक्षम नसल्याचे सध्या चित्र दिसत आहे. माढा



तालुक्यातील वाकाव गावचे सुपुत्र शिंदे गटाचे आरोग्य मंत्री तानाजी सावंत व त्यांचे बंधू शिवाजी सावंत यांचा कुर्डूवाडी नगरपरिषदेच्या निवडणुकीमध्ये अप्रत्यक्ष विरोध दर्शवला जात असे तर २०१९ च्या विधानसभा निवडणुकीमध्ये तानाजी सावंत यांनी शिवसेनेचे उद्धव ठाकरे यांना सोलापूर जिल्ह्यातून जास्तीत जास्त शिवसेनेचे आमदार निवडून देण्याचे आश्वासन दिले होते. मात्र त्याला यश आले नाही. त्यानंतर उद्धव ठाकरे व तानाजी सावंत मध्ये दुरावा निर्माण झाला होता. यानंतर मुख्यमंत्री शिंदे गट स्वतंत्र गट निर्माण झाल्यानंतर तानाजी सावंत यांना आरोग्य मंत्री पद मिळाले. आंधारे यांच्या राज्यभरात सभाचा धडाका सुरू असून मुख्यमंत्री शिंदे गट, भाजप व मनसेवर त्या जोरदार टीका करींत असल्याचे सध्या चित्र दिसत आहे. त्यामुळे त्यांच्या धडाकेबाज भाषणांमुळे सर्वत्र चर्चा सुरू आहे व त्यांना गावागावात ओळखू लागले आहेत. कुर्डूवाडी शहरातील गांधी चौकात दि.२५ रोजी सायंकाळी ६ वाजता सुषमा आंधारे यांची कोणावर तोफ डागणार व कोणा बद्दल काय बोलणार याकडे सगळ्यांचे लक्ष लागले आहे.





सोलापूरचे ग्रामदैवत सिद्धेश्वर महाराजांची यात्रा जवळ आली आहे. त्यापार्श्वभूमीवर मंदिरात डागडुजी करण्यात येत आहे. तसेच परिसरात असलेल्या सर्व मंदिरांना रंगरंगोटी करण्यात येत आहे.

# शहर १०० टक्के कचरामुक्त करण्याकडे पालिकेची वाटचाल

### दोन शिफ्टमध्ये घंटागाड्या : कचऱ्याच्या बदल्यात मोबदला देण्याची सोय

सुराज्य/सोलापूर

शहरातील मुख्य रस्त्यांनंतर आता शहर कचरामुक्त करण्याचा संकल्प महापालिका प्रशासनाने केला आहे. त्यासाठी आता दिवसातून दोनवेळा घंटागाड्या विविध मार्गावर धावण्यासाठी आराखडा घनकचरा विभागाकडून तयार करण्यात येत आहे. त्यामुळे शहर १०० टक्के कचरामुक्त करण्याकडे महापालिकेची वाटचाल सुरू झाली आहे.

शहर कचरामुक्तीसाठी प्रशासन वेगवेगळ्या उपाययोजना करूनही आजतागायत शहर केवळ ७० ते ७५ टक्के कचरामुक्त झाले आहे. महापालिकेने यापूर्वी कोंडाळामुक्त झोन अभियान राबविले मात्र काही दिवसात हे अभियान बंद पडले. दवाखाने, बाजारपेठा व शॉपिंग मॉलसह विविध ठिकाणी जाऊन कचऱ्याचे संकलन केले जाते. मात्र काही दिवसांनी पुन्हा तीच परिस्थिती दिसून येते. सध्या शहरात काही परिसरात दररोज सकाळी, तर काही ठिकाणी दुपारी तर कुठे दोन दिवसाआड अशा पद्धतीने घंटागाड्या शहरात कचरा संकलनासाठी फिरत आहेत. बायोएनर्जी प्रकल्प पूर्ण क्षमतेने चालण्यासाठी प्रतिदिन शहरातून साधारण ४०० टन कचरा उपलब्ध होणे आवश्यक आहे. मात्र सध्या साधारध २५० टन कचरा होत आहे. आता महापालिकेने शहर कचरा मुक्त करण्यासाठी विविध पद्धतींचा अवलंब केला आहे. महापालिका प्रशासनाने नागरिकांना कचऱ्याच्या बदल्यात मोबदला देण्याची सोय देखील शहरातील चार ठिकाणच्या कचरा केंद्रांवर उपलब्ध करून दिली आहे. आता महापालिकेने दोन शिफ्टमध्ये घंटागाड्या विविध मार्गावर सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. सकाळी शहरात



तर दुपारी हद्दवाढ भागात या घंटागाड्या धावणार आहेत. त्याचा आराखडा घनकचरा विभागाकडून तयार करण्याचे काम सुरू आहे. त्यामुळे शहर १०० टक्के कचरामुक्त करण्याकडे महापालिकेची वाटचाल सुरू झाली आहे.

### कचरा रस्त्यावर टाकणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई

कचरा रस्त्यावर टाकणाऱ्यांवर महापालिकेने दंडात्मक कारवाईही सुरू केली आहे. नुकतेच नागरिकांवर कारवाईही महापालिकेने केली आहे. याशिवाय एका हॉस्पिटललाही दंड केला आहे. विविध प्रकारे महापालिका कचरामुक्त शहर करण्यासाठी प्रयत्न करताना दिसत आहे.

### सध्याचे आकडे

एकूण घंटागाड्या : १४६, मार्गावरील फेऱ्या : दिवसाआड दररोज संकलन होणारा कचरा : २५० टन (साधारण): कचरामुक्तीचा नवा संकल्पः एकूण घंटागाड्या : १२५ एकूण मार्ग : १९० मार्गावरील फेऱ्या : दिवसातून दोन वेळा. दररोज संकलन होणारा कचरा : ३०० टन (साधारण)